रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २२३
www.ramprahar.com

शुक्रवार, २८ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## सुधारित वक्फ बोर्ड मसुद्याला केंद्रीय कॅबिनेटची मंजुरी

**नवी दिल्ली** : १४ बदलांसह वक्फ बोर्ड विधेयकाचा सुधारित मसुदा केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केला आहे. आता अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात हे विधेयक संसदेत मंजुरीसाठी मांडण्यात येईल. वक्फ बोर्ड विधेयकावरून गेल्या काही दिवसांपासून चर्चा चालू आहे. हे विधेयक अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात संसदेत मांडण्यात आले होते. त्यानंतर ते संसदीय समितीकडे पाठवण्यात आले. समितीकडून सुचवण्यात आलेल्या शिफारशींपैकी ४४ शिफारशी नामंजूर करण्यात आल्या, तर १४ शिफारशी विचारार्थ घेण्यात आल्या. २७ जानेवारी रोजी संयुक्त संसदीय समितीने या शिफारशी मंजूर केल्या होत्या. त्यानंतर आता केंद्रीय मंत्रिमंडळाची त्याला मान्यता मिळाली आहे. येत्या १० मार्चपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सुरू होत आहे. या काळात विधेयकाचा सुधारित मसुदा संसदेत मंजुरीसाठी मांडण्यात येईल.


### अंतरंग

महामार्गावर मोकाट गुरांमुळे कार उलटून चालक जखमी/२

पनवेल महापालिकेतर्फे रेबीज निर्मूलन उपक्रम/६

चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये यजमान पाकिस्तानची पाटी कोरीच!/८


# बसस्थानक, आगारांचे सुरक्षा ऑडिट करा

## पुण्यातील घटनेनंतर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचे आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वारगेट येथील बसस्थानकामध्ये एका तरुणीवर बसमध्येच अत्याचार झाल्याच्या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच बसस्थानक आणि आगारांचे तातडीने सुरक्षा ऑडिट करण्यात यावे, असे आदेश परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. त्याचप्रमाणे बसस्थानक आणि आगारांमध्ये उभ्या ठेवण्यात येत असलेल्या बस आणि परिवहन कार्यालयांकडून कारवाईमध्ये जप्त केलेल्या वाहनांची १५ एप्रिलपर्यंत विल्हेवाट लावण्यात यावी, अशी सूचनाही परिवहनमंत्र्यांनी दिली आहे.

बसस्थानकांमध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षाविषयक आढावा बैठक गुरुवारी (दि. २७) अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्या दालनात घेण्यात आली. या बैठकीला परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव व एसटी महामंडळाचे अध्यक्ष संजय सेठी, परिवहन आयुक्त व एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय (प्रभारी) विवेक भीमनवार, सहसचिव राजेंद्र होळकर, एसटी महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

बस प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसस्थानकावर असलेल्या सुरक्षा रक्षकांमध्ये महिला सुरक्षा रक्षकांची संख्या वाढविण्याचे निर्देशही परिवहनमंत्री सरनाईक यांनी दिली आहे. याबरोबरच राज्य परिवहन महामंडळाकडे मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी पद असून या रिक्त पदावर भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. याबाबत प्रस्ताव गृह विभागाला विनाविलंब सादर करण्याची सूचनाही त्यांनी केली आहे.



### सर्व बसमध्ये सीसीटीव्ही, जीपीएस अनिवार्य

बैठकीनंतर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी संवाद साधला. या वेळी ते म्हणाले, घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. महाराष्ट्रात कुठेच अशी घटना घडता कामा नये. सर्व लाडक्या बहिणींना परिवहनमंत्री म्हणून विनंती करतो की, तुम्ही पूर्वी ज्या पद्धतीने एसटी प्रवास करत होता तसाच तुमचा प्रवास सुरू ठेवा. प्रवाशांच्या सुरक्षतेसाठी आम्ही आजच्या बैठकीत सर्व बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि जीपीएस ट्रॅकिंग सिस्टम बसवण्याचे निर्देश दिले आहेत. याचबरोबर पुढील काळात एसटी बसेस आणि स्थानकांवर एआयचा वापरही करण्यात येणार आहे.

बसस्थानक किंवा आगारात आलेल्या प्रत्येक बसची नोंदणी सुरक्षा रक्षकाकडे करण्यात यावी. चालक आणि वाहकांनी बस जमा करताना ती बंद असल्याची काळजी घ्यावी. बसचे दरवाजे व खिडक्या बंद असतील याची काळजी घ्यावी. बसस्थानक आणि आगार परिसरात अनाहूतपणे फिरणाऱ्या व्यक्तींवर सुरक्षा रक्षकांनी लक्ष ठेवावे आणि त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. स्थानिक पोलिसांची मदत घेऊन त्यांची गस्त बसस्थानकावर वाढवण्यात यावी. आगार व्यवस्थापक हे त्या आगाराचे पालक असल्यामुळे त्यांनी तेथील निवासस्थानामध्येच वास्तव्य करावे, जेणेकरून २४ तास त्यांच्या निरीक्षणाखाली आगाराचे व्यवस्थापन चालेल. याबरोबरच बसस्थानकावर काम करणाऱ्या प्रत्येक एसटी कर्मचाऱ्याला त्याचे ओळखपत्र देण्यात यावे, जेणेकरून कर्मचारी असल्याचे भासवून प्रवाशांना कोणी लुबाडणार नाही, असेही त्यांनी सूचित केले.

### आरोपी लवकरच पकडला जाईल –गृहराज्यमंत्री कदम

**पुणे** : गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी पुण्यातील बलात्काराच्या घटनेची दखल घेत गुरुवारी (दि. २७) घटनास्थळाला भेट दिली. या प्रकरणाचा त्यांनी पोलिसांकडून आढावा घेतला आणि पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती दिली. या वेळी त्यांनी आरोपीचे संभाव्य लोकेशन ट्रॅक झाले आहे. तो लवकरच पकडला जाईल, असा विश्वास व्यक्त केला.



पुणे बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे फरार असून त्याला पकडण्यासाठी पोलिसांनी बुधवारी आठ पथके तयार केली होती. आता ही संख्या १५ झाली आहे. आरोपीची माहिती देणाऱ्यांना एक लाख रुपये बक्षीसही दिले जाणार आहे. याबाबत माध्यमांशी संवाद साधताना गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, या घटनेची तक्रार आल्यानंतर पोलिसांनी अवघ्या अर्ध्या तासात आरोपीला आयडेंटिफाय केले. त्याला ट्रॅक करायला सुरुवात केली आहे. त्याचे लोकेशन सापडेल, तसे त्याला फॉलो केले जात आहे. मी या प्रकरणाची डिटेल्स देणार नाही, कारण आरोपीचा शोधत सुरू आहे, पण त्याचे संभाव्य लोकेशन ट्रक झाले असून आरोपीला लवकर पकडले जाईल.

# अलिबागमध्ये एसटी बसच्या धडकेत मोटरसायकलस्वार ठार

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग बसस्थानकासमोर एसटी बसने दिलेल्या धडकेमुळे मोटरसायकलस्वार जागीच ठार झाल्याची घटना गुरुवारी (दि. २७) सकाळी ११.३०च्या सुमारास घडली. जयदीप बना असे मृत तरुणाचे नाव आहे. अपघातानंतर संतप्त जमावाने तोडफोड करून वाहतूक रोखली.

पनवेलहून अलिबागला येणाऱ्या एसटी बसचालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने त्याने बसस्थानकासमोर दुचाकी, तीन आसनी रिक्षा आणि समोरील एसटी बसला धडक दिली. या अपघातात १७ वर्षीय दुचाकीस्वाराचा दोन्ही बसच्या मध्ये चिरडून मृत्यू झाला.

अपघात घडल्याचे समजताच यात मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नातेवाईक व गावकरी अलिबाग एसटी आगाराजवळ आले. संतप्त जमावाने रस्ता अडवून एसटी बसवर दगडफेक केली. अपघातग्रस्त मोटरसायकल व एसटी बस रस्त्यातच होती. ही वाहने रस्त्यातून हलविण्यास विरोध केला जात होता. अखेर पोलिसांची जादा कुमक मागविण्यात आली. दरम्यान, मुख्य रस्ता वाहतुकीसाठी बंद होता. त्यामुळे येथील वाहतूक इतर मार्गांनी वळविण्यात आली.

संतप्त जमाव एसटी आगाराजवळ जमल्याने बस बंद ठेवण्यात आल्या. बाहेरून येणाऱ्या एसटी बसदेखील अलिबागच्या बाहेर थांबविण्यात आल्या होत्या. परिणामी प्रवाशांना खासगी वाहनांनी प्रवास करावा लागला. चार तासानंतर अपघातग्रस्त दोन्ही एसटी बस अलिबाग पोलीस ठाण्यात हलविण्यात आल्या. काही वेळाने खासगी वाहतुकीसाठी अलिबागचा मुख्य रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला, तर सायंकाळी ४नंतर आगारातून एसटी वाहतूक पूर्ववत सुरू झाली.

### संतप्त जमावाने वाहतूक रोखली



### उरण पं. स.ची आज आमसभा

**उरण** : येथील पंचायत समितीची आमसभा शुक्रवारी (दि. २८) सकाळी ११ वाजता जेएनपीए वसाहत येथील बहुउद्देशीय सभागृहात आमदार महेश बालदी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या आमसभेसाठी शासकीय व निमशासकीय तसेच विविध प्रकारच्या ६२ आस्थापनांच्या अधिकाऱ्यांना व संबंधितांना निमंत्रित केले आहे.

### पोलादपूर तहसीलदारांविरुद्ध गुन्हा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

जमिनीच्या न्यायप्रविष्ट प्रकरणात लाच मागितल्याप्रकरणी पोलादपूरचे तहसीलदार कपिल घोरपडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जमिनीच्या तफावतीबाबत तक्रारदार यांना अखत्यारपत्र दिलेल्या व्यक्तीने दावा दाखल केला होता. या दाव्याचा निर्णय व आदेशाची प्रत देण्याकरिता तहसीलदार कपिल घोरपडे यांनी तक्रारदार यांच्याकडे तीन लाखांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती दोन लाख ५० हजार रु. देण्याचे ठरले. दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ५ व १८ फेब्रुवारीला सापळा लावला होता, मात्र घोरपडे यांना संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्वीकारली नाही. लाच मागितल्याने त्यांच्याविरुद्ध पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## निवडक

### संतोष देशमुख हत्येप्रकरणी मकोका कोर्टात चार्जशीट दाखल

**बीड** : मस्साजोग (ता. केज) सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाबरोबरच अवादा कंपनीस मागितलेली खंडणी तसेच सुरक्षारक्षक सोनवणे यांना झालेल्या मारहाण प्रकरणातील अॅट्रॉसिटी या तिन्ही प्रकरणांचे दोषारोपपत्र मकोका न्यायालयात गुरुवारी (दि.२७) दाखल करण्यात आले. दरम्यान, ८० दिवसांच्या आत प्रकरण न्यायालयात दाखल झाल्याने आरोपींना जामीनसुद्धा मिळणे कठीण होणार आहे.

### निवडणूक आचारसंहिताभंग; कोर्टाने दोघांना सुनावली शिक्षा

**अलिबाग** : विधानसभा निवडणुकीत श्रीवर्धन मतदारसंघाचे शिवसेना उबाठा पक्षाचे उमेदवार अनिल नवगणे यांना ओबीसी समाजाने मतदान करून निवडून आणावे म्हणून यशवंत श्रीपत शिंदे व सुनील विठोबा जाईलकर यांनी फतवा काढला होता. यामुळे आचारसंहिताभंग झाल्याचा अदखलपात्र गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणी न्यायालयाने आरोपींना प्रत्येकी ३० हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १० दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावली.

# सीकेटी कॉलेजमध्ये सोमवारी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे पदवी आणि पदव्युत्तर वर्षाच्या वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन येत्या सोमवारी (दि. ३ मार्च) सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.

संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा मुंबई विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित राहणार आहेत, तर विशेष उपस्थिती संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, सदस्य व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे आणि संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य यांची लाभणार आहे. त्याचबरोबर प्राचार्य डॉ. एस.के. पाटील, तिन्ही विद्याशाखांचे आणि विविध विभागांचे प्रमुख हे मान्यवरांसोबत मंचावर उपस्थित राहणार आहेत.

या समारंभात पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि पदवी प्रमाणपत्र तसेच विद्यावाचस्पतीप्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि पदवी प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

समारंभ यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाच्या अध्यक्ष डॉ. एम.ए. म्हात्रे, परीक्षा नियंत्रक डॉ. एस.आय. उन्हाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी.डी. आघाव आदी परिश्रम घेत आहेत.

# पनवेल मनपातर्फे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

## कुसुमाग्रजांच्या कवितेतून स्फुर्ती घेऊन पुढे पाऊल टाकत राहू –आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठीतील प्रसिद्ध कवी, नाटककार कुसुमाग्रज अर्थात वि.वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस आणि त्याला अनुसरून मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने पनवेल महानगरपालिकेच्या वतीने प्रा. विसूभाऊ बापट यांच्या 'कुटुंब रंगलंय काव्यात' या कार्यक्रमाचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात गुरुवारी (दि. २७) करण्यात आले. या वेळी माझी वसुंधरा अंतर्गत पर्यावरणपूरक गणपती उत्सव स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकाचे वितरण करण्यात आले.



कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने उपस्थित होते. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, कवी कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून महाराष्ट्राचे नाव भारतभर पसरविले. त्यांच्या कवितेतून स्फुर्ती घेऊन आपण पुढे पाऊल टाकत राहू. पनवेल महापालिकेला माझी वसुंधरा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला. हा गौरव मिळवून देण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले त्यांचा महापालिका सन्मान करते आहे ही अभिनंदनीय बाब आहे. पनवेल शहराला अधिक सुंदर बनविण्यामध्ये या सर्वांचा हातभार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, प्रा. विसूभाऊ बापट यांच्या कुटुंब रंगलंय काव्यात या कार्यक्रमाला श्रोत्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. कवितेमधील विविध भावनांचे सादरीकरण त्यांनी केले. (पान २ वर..)




'कुटुंब रंगलंय काव्यात'ला प्रतिसाद

# रोप-वेमुळे कनकेश्वर दर्शनासाठीचा मार्ग होणार सुलभ

**अलिबाग : प्रकाश सोनवडेकर**

अलिबागजवळच्या श्रीक्षेत्र कनकेश्वर देवस्थानच्या दर्शनाला जाण्यासाठीचा मार्ग सोपा होणार आहे. राज्यातील एकूण ४५ देवस्थानांवर जाण्यासाठी रोप-वे उभारण्यास नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये अलिबाग तालुक्यातील कनकेश्वर आणि अलिबाग समुद्रकिनारा ते कुलाबा किल्ला या मार्गांचाही समावेश आहे.

अलिबागकरांसह संपूर्ण जिल्ह्याचे श्रद्धास्थान असलेल्या मापगाव येथील श्रीक्षेत्र कनकेश्वर येथे जाण्यासाठी सुमारे ३०० पायऱ्या चढून जावे लागते. त्यामुळे अनेकदा वृद्ध भक्तांना दर्शनासाठी जाता येत नाही. तरुण मंडळीदेखील पायरी मार्गाने जाणे टाळतात. त्यामुळेच या ठिकाणी रोप-वेची उभारणी करण्यात येणार आहे. यासोबतच कुलाबा किल्ल्यातील ऐतिहासिक गणपतीचे मंदिर म्हणजे गणेश पंचायतन हे अलिबागकरांचे आराध्य दैवत मानले जाते. हे मंदिर अरबी समुद्रात असणाऱ्या कुलाबा किल्ल्यात आहे. त्यामुळे गणपतीचे दर्शन घेण्यासाठी ज्या वेळी ओहोटी असेल त्याचवेळी जाता येते. इतर वेळी किल्ल्यात जाण्यासाठी स्थानिक कोळी बांधवांच्या बोटी उपलब्ध असतात, मात्र त्यास फारसा प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे किनाऱ्यापासून किल्ल्यात जाण्यासाठीही रोप-वेची उभारणी करण्यात येणार आहे.





केंद्राच्या राष्ट्रीय राज्यमार्ग लॉजिस्टिक व्यवस्थापन लि. आणि राज्य सरकारकडून पर्वतमाला परियोजनेंतर्गत रोप-वेची उभारणी करण्यात येणार आहे. कनकेश्वर येथील रोप-वेची जबाबदारी रायगड जिल्हा परिषदेची, तर समुद्रकिनाऱ्यावरील रोप-वेची जबाबदारी अलिबाग नगर परिषदेची आहे.

रोप-वेची उभारणी करताना विविध पर्यायांचा विचार केला जाणार आहे. राज्य सरकारकडून जागा उपलब्ध करून देणे, त्यात समभाग घेऊन महसूल मिळवणे, खासगी सार्वजनिक प्रकल्पाच्या आधारावर उभारणी करणे आणि बांधा, वापरा, हस्तांतरित करा या मार्गाचा अवलंब करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील किल्ले रायगड, माथेरान, घारापुरी एलिफंटा लेणी येथेही रोप-वेची उभारणी करण्यात येणार आहे.

> **कनकेश्वर रोप-वेचा प्रस्ताव आधीच पाठवला आहे. वर्षभर देवस्थानाला भेट देणाऱ्यांची संख्या मोठी आहे, परंतु तेथे पोहचणे वयोवृद्ध, लहान मुलांना शक्य होत नाही. रोप-वेमुळे भाविकांना दिलासा मिळेल. असाच प्रस्ताव कुलाबा किल्ल्याचाही आहे.**
> **-महेंद्र दळवी, आमदार, अलिबाग**

### पर्यटनाचे नवे दालन

मापगावच्या डोंगरावर असलेले श्रीक्षेत्र कनकेश्वर हे ठिकाण पर्यटकांसाठी अपरिचित आहे. रोप-वे सुविधा उपलब्ध झाल्यास पर्यटनाचे नवे दालन खुले होणार आहे. याशिवाय अलिबागला येणारे पर्यटक समुद्रकिनारी फिरणे किंवा समुद्र स्नान, वॉटरस्पोर्ट्सचा आनंद घेतात. रोप-वेची सुविधा झाल्यास मराठा आरमाराचे मुख्यालय असलेल्या कुलाबा किल्ल्यावर पर्यटकांना सहज जाता येणार आहे. सध्या पर्यटक दुरूनच या किल्ल्याचे दर्शन घेतात.

# महाकुंभमेळ्याच्या सांगतेनंतर पंतप्रधान मोदींनी मानले भाविकांचे आभार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जगातील सर्वांत मोठ्या स्वरूपाचा धार्मिक सोहळा असलेल्या महाकुंभमेळ्याची महाशिवरात्रीच्या स्नानानंतर सांगता झाली आहे. प्रयागराज येथे ४५ दिवस चाललेल्या या कुंभमेळ्यात देशाच्या कानाकोपऱ्यातून कोट्यधी भाविकांनी येऊन संगमावर पवित्र स्नान केले. कुंभमेळ्याच्या सांगतेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याचे वर्णन करताना हा 'एक्याचा महायज्ञ' असल्याचे म्हटले आहे तसेच या भव्य दिव्य आयोजनात सहभागी झाल्याबद्दल भाविकांचे आभारही मानले.



महाशिवरात्रीला हर हर महादेवच्या जयघोषाने महाकुंभ मेळ्याचा परिसर निनादला. अखेरच्या दिवशी पवित्र स्नान करण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. कुंभमेळा प्रशासनाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार या दिवशी बुधवारी रात्री ८ वाजेपर्यंत सुमारे १.५३ कोटी लोकांनी पवित्र स्नान केले, तर १३ जानेवारीपासून ४५ दिवस सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यात एकूण तब्बल ६६.३० कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केले.


पंतप्रधान मोदींनी यावर भाष्य केले आहे. १४० कोटी देशवासीयांची श्रद्धा जेव्हा एकाच वेळी एका ठिकाणी येते, तेव्हा ते दृष्य अविस्मरणीय बनते. प्रयागराजमधील कुंभमेळ्यादरम्यान आपण हेच अद्भूत दृश्य बघितले. हे आयोजन म्हणजे केवळ एक धार्मिक उत्सवच नाही, तर आपल्या सांस्कृतिक ऐक्याचे आणि अखंडतेचे प्रतिक आहे. जेव्हा एखादे राष्ट्र शतकानुशतकांची गुलामगिरीची मानसिकता तोडून पुढे वाटचाल करते आणि मोकळा श्वास घेते, तेव्हा ज्या पद्धतीचे दृश्य दिसते, अगदी तसेच दृश्य आपण कुंभमेळ्यात बघितले, असे पंतप्रधान मोदींनी त्यांच्या एक्स अकाऊंटवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

# प्रलंबित वनहक्क दावे निकाली काढण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवा - राज्यपाल

## ◆ वनहक्क कायदा २००६च्या अंमलबजावणीचा आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

वनहक्क कायद्याची कालबद्धपणे अंमलबजावणी करण्यासाठी वैयक्तिक व सामूहिक वन हक्कांचे प्रलंबित दावे तातडीने निकाली काढण्यात यावेत. तसेच वन हक्क लाभार्थींचे आधारकार्ड जोडणी, प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेत नोंदणी आदी कामेही विशेष शिबिर घेऊन पूर्ण करण्याचे निर्देश राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी दिले.



राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यातील सहा विभागीय आयुक्त तसेच शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची मुंबईतील राजभवन येथे बैठक घेऊन वनहक्क कायदा, २००६ च्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. बैठकीला आदिवासी विभागाचे सचिव डॉ. विजय वाघमारे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, आदिवासी विकास विभागाचे सहसचिव मच्छिन्द्र शेळके, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी (कोकण), चंद्रकांत पुलकुंडवार (पुणे), डॉ. प्रवीण गेडाम (नाशिक), दिलीप गावडे (छत्रपती संभाजीनगर), श्वेता सिंघल (अमरावती) व डॉ. माधवी खोडे चावरे (नागपूर) तसेच इतर वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित होते.

सर्व विभागीय आयुक्तांनी वनहक्क दाव्यांची प्रलंबितता दूर करण्यासाठी स्वतः लक्ष घालून कामे करावीत. तसेच यासंदर्भातील प्रगतीचा अहवाल दर पंधरा दिवसांनी राजभवनला देण्यात यावा. हे दावे निकाली काढण्यासाठी तसेच आदिवासी नागरिकांचे आधार कार्ड काढणे, वैयक्तिक वन हक्क धारक शेतकऱ्यांचा प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेत समावेश करणे आदींसाठी आदिवासी भागात विशेष शिबिर घेण्यात यावे. तसेच वन हक्क दाव्यांचे डिजिटायझेशन व स्कॅनिंगची कामे पूर्ण करावीत. वन हक्क दाव्यांच्या प्रकरणांसाठी ऑनलाईन पोर्टलचा वापर करावा. वन हक्क कायद्याच्या अंमलबाजावणीसंदर्भात केलेल्या कार्यवाही अहवाल दर पंधरा दिवसांनी सादर करावा, असे निर्देशही त्यांनी या वेळी दिले.

### स्कूल कनेक्ट उपक्रम राबविणार

***उच्च शिक्षणात आदिवासी विद्यार्थ्यांचा टक्का कमी आहे. त्यामुळे या प्रवर्गातील जागा रिक्त राहतात. उच्च शिक्षणात आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविण्यासाठी राज्यातील विद्यापीठांसोबत 'स्कूल कनेक्ट' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. यातून शाळांमधील आदिवासी विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनीही महिन्यातून एकदा एकलव्य शाळांना भेटी द्याव्यात, असे निर्देश श्री. राधाकृष्णन यांनी यावेळी दिले.***

अनेक जिल्ह्यात सर्व सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समित्यांची अद्याप करण्यात आली नाही. येत्या महिनाभरात या समित्यांची स्थापना करण्यात याव्यात. तसेच या समित्याच्या कामकाजासंदर्भात तसेच सामुहिक वन संवर्धन व व्यवस्थापन आराखड्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करावेत, असेही राज्यपालांनी या वेळी सांगितले.

आदिवासी भागातील कुपोषण, सिकलसेल एनिमिया आदी आरोग्यविषयक समस्यांवरही गांभीर्याने कामे करावीत. यासाठी आदिवासी भागात आवश्यक तेथे आरोग्य केंद्र उभारणे, तेथे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नियुक्त करून आरोग्य सुविधा वाढविण्यावर भर देण्यात यावा. तसेच प्रत्येक जिल्ह्यात फिरता दवाखाना (हॉस्पिटल ऑन व्हिल) ही संकल्पना राबविण्यात यावी, अशी सूचना त्यांनी या वेळी केली.

# नरेंद्रचार्य महाराजांच्या भक्तगणांकडून विजय वडेट्टीवारांचा पेणमध्ये निषेध



**पेण : प्रतिनिधी**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी नरेंद्राचार्य महाराज यांच्याविषयी केलेल्या अपमानास्पद वक्तव्यावरून विविध स्तरांतून त्यांच्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर पेण नगरपरिषदेच्या समोरील चौकात नरेंद्र महाराज यांचे शिष्य आणि अनुयायांनी विजय वडेट्टीवार यांच्या विरोधात जोरदार आंदोलन करून निषेध व्यक्त केला.

नरेंद्राचार्य महाराज हे लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असून, त्यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्यामुळे अनुयायांमध्ये मोठा संताप पसरला आहे. या वक्तव्याचा निषेध करत संतप्त अनुयायांनी वडेट्टीवार यांनी तातडीने जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली.

पेण नगरपरिषदेच्या समोरील चौकात झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने भक्तगण सहभागी झाले होते. परिसरात घोषणा देत फलक दाखवत विजय वडेट्टीवार यांच्या वक्तव्याचा निषेध करीत आंदोलनकर्त्यांनी वडेट्टीवार यांच्या वक्तव्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. अनेकांनी हातात पोस्टर आणि फलक घेत निषेध नोंदवला. पोस्टरला काळे फासण्यात आले व फोटोला जोडे मारण्यात आले.

संतांच्या बाबतीत अशी वक्तव्ये करणे अयोग्य असून, त्यामुळे लाखो भक्तांच्या भावना दुखावल्या जातात, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले. संत हे समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करतात, अशा पवित्र व्यक्तीबद्दल अनादराची भाषा वापरणाऱ्या माफी मिळणार नाही, असे पेण तालुका अध्यक्ष किरण म्हात्रे, आकाश पाटील यांनी सांगितले.

# ट्रकमधील केमिकलच्या ड्रमला आग; ट्रक जळून खाक

**खोपोली : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर आज पहाटे एका ट्रक मधील केमिकलच्या ड्रमला अचानक आग लागल्याने त्या आगीत ट्रक जळून खाक झाला आहे,

मुबंई पुणे एक्सप्रेसवेवर अशोक लेलंड ट्रक चालक वसीम खान (वय ५०, रा. तुमकूर, बंगलूर कर्नाटक) हा ट्रक घेऊन भिवंडी ते बंगलूर कडे जातं असताना तो खालापूर हद्दीत आंबिवली गावाजवळ आला असता ट्रक मधील केमिकलच्या ड्रमला अचानक आग लागली .त्यामुळे ट्रकलाही मोठया प्रमाणात आग लागली, चालकाच्या सावधानतेने चालक आणि क्लीनर यांनी तात्काळ बाहेर उडी मारल्याने मोठी जीवित हानी टळली,

या अपघातातनंतर खोपोली अग्निशमन दल, आयआरबी फायर ब्रिगेड तात्काळ घटनास्थळी दाखल होत आग विझावण्याचे शर्थीचे प्रयत्न केले, मात्र या आगीत ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला होता, आग विझवल्यानंतर अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या बाजूला घेऊन एक्सप्रेसवे वाहतूकसाठी चालू करण्यात आला

# मोकाट गुरांमुळे कार पलटी; चालक जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गांवर विणेगावजवळ कारने समोरील समोरील मोकाट जनावाराला धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून या अपघातात कार सुरक्षा कठड्याला धडकून पलटी झाली, या अपघातात कार चालक किरकोळ जखमी झाला आहे मुबंई पुणे जुन्या महामार्गांवर मोकाट जनावरे दिवसेंदिवस रस्त्यावर भटकत असून



त्यामुळे आज कर्जत वरून खालापूरकडे विवेक सुदाम पारिंगे रा निंबोडे आपली कार ही घेऊन जातं असताना ते विनेगाव जवळ आले असता अचानक जनावर आडवे आल्याने कार चालकाचे का रवरील नियंत्रण सुटल्याने कार सुरक्षा कठड्याला धडकून पलटी झाली, या अपघातात कार चालक किरकोळ जखमी झाला असून कार मधील अन्य कोणालाही लागले नाही कारचे मात्र मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# प्रत्येक मराठीजनाने मातृभाषेचा अभिमान बाळगावा -न्या. साटोटे

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

मराठी अभिजात भाषा आहे. प्रत्येक मराठी व्यक्तीने आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगला पाहिजे. आधुनिक काळाच्या स्पर्धेत इंग्रजीचे ज्ञान असावं मात्र मातृभाषेकडे दुर्लक्ष करू नये .असे प्रतिपादन श्रीवर्धन न्यायालयाचे न्यायाधीश अनिल साटोटे यांनी केले आहे .



श्रीवर्धन न्यायालयात मराठी भाषा संवर्धन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात प्रमुख वक्ते र. ना. राऊत महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्राध्यापक सत्यवान सोनकांबळे यांनी मराठी भाषेची उत्पत्ती, व्याप्ती व इतिहास याविषयी मार्मिक भाष्य केले. मराठी भाषा गौरवशाली भाषा आहे. भारत देशाला दिशा देण्याचे काम मराठी माणसाने केलेले आहे असे सांगितले .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विधिज्ञ संतोष सापते यांनी केले व आभार प्रदर्शन विधीज्ञ विठोबा पाटील यांनी केले. कार्यक्रमासाठी श्रीवर्धन वकील ज्येष्ठ विधीज्ञ असगर ईसाने , आशिष वढावकर , स्वानंद दातार , मनीष लाड, मंदार ठोसर, अतुल चौगुले, न्यायालयीन कर्मचारी अलोक श्रीवर्धनकर इतर कर्मचारी आणि पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# नाशिक येथे ऑडिटर्स महाकुंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ऑडिटर कौन्सिल अँड वेल्फेअर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य वतिने राज्यस्तरीय अधिवेशन नाशिक येथे दिनांक २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२५ रोजी ऑडिटर्स महाकुंभ २०२५ आयोजित करण्यात येत आहे

सदर अधिवेशनस राज्यभरातून मोठ्या प्रमाणात लेखापरीक्षक उपस्थित राहणार आहेत व यामध्ये लेखापरीक्षणासंदर्भात शिक्षण, प्रशिक्षण, चर्चा, विचार- मंथन करण्यात येते.

प्रभू श्री रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तपोभूमी म्हणजेच नाशिक येथे होणार आहे. यासाठी आपणा सर्व लेखापरीक्षक बंधू आणि भगिनी यांना विनंती करण्यात येते की सर्वांनी या राज्यस्तरीय अधिवेशनात मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा. सहभाग घेण्यासाठी खाली दिलेला गुगल फॉर्म भरून द्यावा. व आम्हास स्क्रीनशॉट पाठविण्यात यावा म्हणजे आपले पुढील योग्य नियोजन करण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

# माणगाव टीएमसी कॉलेजमध्ये रक्तदान आणि नेत्रदानाविषयी जागरूकता

**माणगाव: प्रतिनिधी**

टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगावमध्ये मंगळवार ( दि.२५ ) रोजी शासनाच्या व मुंबई विद्यापीठाच्या आदेशानुसार स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्ताने रक्तदान, नेत्रदान व अवयव दान याविषयी जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात प्रा. हर्षल जोशी यांनी रक्तदानाप्रमाणेच नेत्रदान करणे हे सुद्धा महत्त्वाचे कार्य आहे ज्याप्रमाणे रक्तदान करण्याची निवड करणाऱ्या व्यक्तींच्या निस्वार्थतेवर प्रकाश टाकते त्याचप्रमाणे अंधत्व असलेल्या असंख्य व्यक्तींची दृष्टी पूर्ववत करण्यात आणि त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यात नेत्रदान महत्त्वाची भूमिका बजावते.

त्याचप्रमाणे अवयव दानामध्ये लिव्हर, किडनी, हृदय असे अवयव दान करून एखाद्या व्यक्तीचं जीवन आपण वाचू शकतो अशा स्वरूपात मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली. यावेळी महाविद्यालयामध्ये रक्तदान, नेत्रदान व अवयव दान यावर निबंध स्पर्धा, भितीपत्रक स्पर्धा घेण्यात आल्या.



# रसायनी येथे कामगार आरोग्य योजनेचा शुभारंभ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा येथील डॉ. पाटील हॉस्पिटल रसायनी येथे कामगार आरोग्य विमा योजना सुरू करण्यात आली आहे. हे सुसज्ज असे हॉस्पिटल असून येथे सर्व प्रकारच्या आजारांवर उपचार केले जातात तसेच येथे सर्व प्रकारचे ऑपरेशनही केले जातात. या हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारच्या इन्शुरन्स कंपनीकडून कॅशलेस मेडिक्लेमची सुविधा देखील उपलब्ध आहे. पाताळगंगा इंडस्ट्रीयल एरिया मधील कामगारांची वाढती संख्या पाहता येथे कामगार आरोग्य विमा योजनेची सुरुवात करण्यात आली आहे . कामगार आरोग्य योजनच्या कक्षेत येणाऱ्या सर्व कामगारांसाठी ऍडमिट होण्याची सुविधा सुरू झालेली आहे

तसेच कामगार आरोग्य योजनच्या कक्षेत येणाऱ्या सर्व आजारांवर मोफत उपचार केले जातील, अशी माहिती हॉस्पिटलचे संचालक डॉ. जितेंद्र पाटील यांनी दिली आहे आणि परिसरातील सर्व कामगार आरोग्य योजना धारकांनी या योजनेचा जरूर लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# नॅशनल कॉम्प्युटर आणि मराठी पत्रकार संघाकडून वृद्धाश्रमात ज्येष्ठांना फळवाटप

**पेण : प्रतिनिधी**

नॅशनल कॉम्प्युटर व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून महाशिवरात्री उत्सव निमित्त बुधवार ( दि. २६) रोजी पेण अहिल्या मंडळ आणि तरणखोप अहिल्या मंडळ वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना फळवाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील नागरिकांना आरोग्यदायी आहार मिळाला आणि त्यांच्यासोबत काही आनंदाचे क्षण देखील घालवण्यात आले.



या कार्यक्रमास नॅशनल कम्प्युटरच्या संचालिका स्मिता शेळके, सुदर्शन शेळके, पत्रकार स्वप्नील पाटील, किरण बांधणकर, गणेश पाटील, प्रशांत पोतदार, राजेश प्रधान, रूपेश गोडीवले, व निवृत्त शिक्षक सी आर म्हात्रे, समीर घायतळे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी वृद्धांनी आपल्या आठवणी सांगत समाधान व्यक्त केले. हा उपक्रम वृद्धांना मानसिक आधार देणारा ठरला.

समाजातील वंचित आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी असे उपक्रम नियमित घेतले जावेत, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व नॅशनल कम्प्युटर यांच्यातर्फे भविष्यातही सामाजिक कार्य करत राहण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

पान १ वरुन

## पनवेल मनपातर्फे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

यामध्ये 'बाप्पा तुम्ही याहो खूप खूप दिवस रहायला' अशा बालकवितांपासून ते तरुणाईला भुरळ घालणाऱ्या मंगेश पाडगावकरांच्या 'त्याने प्रेम केले, तुमचे काय गेले' अशा अनेक कविता सादर केल्या तसेच शायर भाऊसाहेब पाटणकरांच्या 'सांगेन काही भव्य ऐसी शायरी माझी नव्हे, तो कविचा मान तितुकी पायरी माझी नव्हे' अशा शायरीपासून ते चारोळ्यापर्यंत कवितेच्या अनेक प्रकारांचे प्रा. बापट यांनी सादरीकरण केले. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवींबरोबरच अपरिचित कविंच्या कविता सादर करताना कवितेमागील अनेक किस्से, आठवणी त्यांनी सांगितले.

या वेळी पनवेल महापालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत घेण्यात आलेल्या काव्य वाचन स्पर्धेतील विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. त्याचप्रमाणे माझी वसुंधरा अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा अंतर्गत वैयक्तिक स्तरावरील दीड दिवस, तीन दिवस, पाच दिवस गणेशोत्सव विजेते व दहा दिवसांच्या सार्वजनिक गणेशोत्सवामधील विजेत्या मंडळांना बक्षीस वितरण करण्यात आले. महापालिकेच्या वतीने गणेशोत्सवांदरम्यान कृत्रिम तलावामध्ये गणेश विसर्जन उपक्रमासाठी ज्या शाळा, महाविद्यालयांनी सहकार्य केले त्या शाळा, महाविद्यालयांचा या वेळी सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, नाट्यगृह विभाग प्रमुख राजेश डोंगरे, बक्षीस विजेते गणेशोत्सव मंडळांचे प्रतिनिधी, विविध शाळांचे विद्यार्थी, शिक्षक, एनजीओ प्रतिनिधी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी नगरसचिव अक्षय कदम यांच्या हस्ते विसुभाऊ बापट यांना स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. ओमप्रकाश साळस्कर यांनी तबल्यावर उत्तम साथ दिल्याबद्दल त्यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त कैलास गावडे यांनी केले, तर आभार डॉ. राजू पाटोदकर यांनी मानले.

# विळे मराठी शाळेत मराठी भाषा दिन उत्साहात साजरा

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद विळे शाळा ही तब्बल ११३ वर्षाची परंपरा असलेली शाळा आहे . या भागात विळे एमआयडीसी मुळे फक्त स्थानिकच नव्हे तर महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड येथीलही कामानिमित्त आलेल्या कामगारांची मुले इथे शिक्षण घेत आहेत. शाळेत २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला.



सकाळीच बालसभा घेण्यात आली. संत ज्ञानेश्वर यांनी म्हटल्याप्रमाणे माझ्या मराठीचे कौतुके अमृतात ही पैजा जिंके ऐसे रसिके अक्षरे मिळविले. मराठी भाषेचा हा गौरव व मराठी भाषेची परंपरा विद्यार्थ्यांना सांगण्यात आली. जगामध्ये सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठी भाषा दहाव्या क्रमांकावर आहे तर आपल्या देशामध्ये सर्वात जास्त बोलण्यामध्ये तिसऱ्या क्रमांकावर ती भाषा आहे.

फक्त महाराष्ट्रात नव्हे तर,,गुजराय गोवा मध्य प्रदेश दिल्ली येथे अनेक राज्यात मराठी भाषिक आहेत. आपल्या महाराष्ट्रातील कर्तुत्ववान ठरलेले अनेक मराठी पुरुष महिला महापुरुष यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळेस मोठ्या प्रमाणात शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य पालक वर्ग उपस्थित होते. विद्यार्थी आकर्षक अशी वेशभूषा करून मुले मराठमोळे मावळ्याच्या वेशात तर मुली आपला पारंपारिक साडी पेहराव घेऊन घालून आल्या होत्या.

या वेळेला आवर्जून मुख्याध्यापक दीपक ओव्हाळ, उपशिक्षक रवींद्र चांगण यांनी मार्गदर्शन केले व गावातून भाषेबद्दल जनजागृती प्रभात फेरी काढण्यात आली.

## निवडक

### पाताळगंगा नदीत तरुणाचा मृत्यू

**मोहोपाडा :** पनवेल तालुक्यातील गुळसुंदे येथील पाताळगंगा नदीत उडी मारणाऱ्या तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. शंकर सुरेश फसाले (वय २३, रा. शिंदेवाडी-मोहोपाडा) याने दारूच्या नशेत पाताळगंगा नदीमध्ये उडी मारल्याने तो बुडाला व त्याचा मृत्यू झाला. त्याला चौक ग्रामीण रुग्णालय येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहनिरीक्षक माळी व तपासिक सहाय्यक फौजदार एल.जी. कोळेकर अधिक तपास करीत आहेत.



### चिंध्रण येथून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कामानिमित्त बाहेर पडलेली तरुणी अद्याप घरी न परतल्याने ती हरवल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बेपत्ता तरुणीचे नाव मुस्कान इक्बाल शेख (वय १९, रा. चिंध्रण) असून तिचा रंग गोरा, उंची पाच फुट, बांधा मध्यम, अंगात गुलाबी पंजाबी ड्रेस, पायात चप्पल घातलेली. सोबत काळी बॅग, हिंदी मराठी भाषा बोलता येत असून सोबत एमआय कंपनीचा मोबाईल आहे. या तरुणीबाबत माहिती असल्यास त्यांनी तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४) किंवा हवालदार धनाजी तांडेल (९५९४७९५५७७) यांच्याशी संपर्क साधावा.



### आज पोपटी कविसंमेलन

**पनवेल :** कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या वतीने पोपटी कविसंमेलनाचे आयोजन २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता सुकापूरच्या भगतवाडी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे. या कविसंमेलनात कवी, साहित्यिक, लेखक यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, सामाजिक कार्यकर्ते विलास भगत यांनी केले आहे. पोपटी कविसंमेलन हा एक साहित्यिक उपक्रम असून गेली २१ वर्षे पनवेल आणि परिसरातील शेतमळ्यात त्याचे ज्येष्ठ साहित्यिक प्रा.एल.बी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात येत आहे.



**पनवेल : महाशिवरात्रीनिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कुंडेवहाळ येथील महादेवाच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले.**

# मराठी भाषा दिवस उत्साहात साजरा

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कवी कुसुमाग्रजांना अभिवादन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.२७) ग्रंथालय समितीच्या वतीने मराठी भाषा दिवस साजरा करण्यात आला.

ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. या क्षणाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या वेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. पूजा लांजेकर व ग्रंथपाल वैभव झगडे त्यांनी केले तसेच ग्रंथालय समितीतील इतर सर्व सदस्य शिक्षक व शिक्षकेत कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



## 'सीकेटी'मध्ये ग्रंथदिंडी, पालखी मिरवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी माध्यम-माध्यमिक विभाग विद्यालयात गुरुवारी (दि.२७) 'मराठी राजभाषा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत ग्रंथदिंडी, पालखी मिरवणूक, विद्यार्थ्यांचे लेझीम पथक जल्लोषात फिरवण्यात आले.

मुख्याध्यापक कैलास सत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयेजन करण्यात आले. कार्यक्रमांतर्गत ज्येष्ठ साहित्यिक कवीश्रेष्ठ वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा गौरव व्यक्त करणारे शैक्षणिक साहित्य तयार केले. विद्यार्थ्यांनी कथा, कविता, भाषिक खेळ, शब्दकोडी या साहित्यांची निर्मिती केली व सुबक मांडणी केली. तसेच विद्यार्थ्यांनी भाषण, गीत सादर केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगण्याविषयी आपले विचार व्यक्त केले.

मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी मराठी राजभाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# पनवेल मनपातर्फे 'सीकेटी'च्या एनएसएस विभागाचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाचा पनवेल महानगरपालिकेमार्फत मराठी भाषा गौरव दिनानिमित्तच्या कार्यक्रमामध्ये करण्यात आला.



पनवेल महानगरपालिका आयोजित बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा २०२४ मध्ये सीकेटी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच पर्यावरण संवर्धन संघामधील स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग घेऊन पर्यावरणाची हानी होणार नाही. यासाठी गतवर्षातील गणेश उत्सव सोहळ्यामध्ये विसर्जन प्रक्रियेदरम्यान स्वयंसेवकांमार्फत निर्माल्य विभाजन, विसर्जनासाठी येणाऱ्या लोकांची नोंद, पाणी वाटप, शीतपेय वाटप अशा प्रकारे उस्फूर्तपणे कार्य करून गणेशोत्सव विसर्जन सोहळा यशस्वीरित्या होण्यास यश आले होते.

अशा या अमूल्य सहकार्याबद्दल पनवेल महापालिकामार्फत गुरुवारी (दि.२७) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे मराठी भाषा गौरव दिन या कार्यक्रमाच्या औचित्याने सीकेटी महाविद्यालय, खांदा कॉलनी (स्वायत्त) एनएसएस. युनिट, पर्यावरण संवर्धन संघ यांचा सन्मान आमदार प्रशांत ठाकूर व विधान परिषद आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी मनपा उपायुक्त डॉ. वैभव विधाते मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात पनवेल महापालिकेमार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये सीकेटी महाविद्यालयाचा सक्रिय सहभाग असल्याचे सांगण्यात आले. त्याचबरोबर प्राचार्य प्रो. डॉ. एस के पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ.सूर्यकांत परकाळे तसेच महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. योजना मुनीव कार्यक्रम अधिकारी प्रा.आकाश पाटील, प्रा. आलोक भानुशाली, प्रा.रुपेश माने, प्रा. रूपाली पाटील व प्रा. पूजा दांदळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सन्मानाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन यशवंत देशमुख, संस्थेचे सचिव डॉ.एस. टी. गडदे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कौतुक केले.

## पोलीस आणि पत्रकारांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

रायगड प्रेस क्लब अंतर्गत पनवेल तालुका प्रेस क्लबच्या वतीने लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आणि पनवेल तालुका प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस कर्मचारी आणि पत्रकार यांच्यासाठी येत्या शनिवार १ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आलं आहे.

या कार्यक्रमास पनवेल आमदार प्रशांत ठाकूर, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, मेडी. डायरेक्टर लक्ष्मी आय इन्स्टिट्यूटचे प्रसिद्ध नेत्रचिकित्सक डॉ. सुहास हळदीपुरकर, पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील, पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे याचबरोबर भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस तथा माजी नगरसेवक नितीन पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील, तर या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थितीमध्ये मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कोकण विभागीय सचिव मनोज खांबे रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे उपस्थित असतील.

## तळोजातील बी.जी. शिर्के कामगार वसाहतीमध्ये गॅस सिलिंडरचा स्फोट

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा येथील बी.जी. शिर्के कामगार वसाहतीमध्ये महाशिवरात्री दिनी सकाळी सिलेंडर मधून झालेल्या गॅस गळतीमुळे लागलेल्या आगीत कामगारांच्या घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.



गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याची माहिती मिळताच कळंबोली येथील अग्निशमन दल जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन वेळीच आग आटोक्यात आणल्याने पुढील अनर्थ टळला.

तळोजा फेज-२ मध्ये सिडको गृहनिर्माण प्रकल्पाचे काम शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत सुरू आहे. या कंपनीत काम करणाऱ्या कामगारांच्या निवासासाठी लोखंडी पत्र्यांची घरे उभारण्यात आली आहेत. या ठिकणी सकाळच्या सुमारास झालेल्या सिलेंडर गॅस गळतीमुळे लागलेल्या आगीत पंधरापेक्षा अधिक घरे जळून खाक झाली. या आगीत कामगारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

आगीमुळे परिसरात मोठया प्रमाणात धूर पसरला होता. आगीत बहुतांश घरातील जीवनावश्यक साहित्य जळून खाक झाले. अग्निशमन दल जवानांनी वेळीच तीन सिलेंडर बाहेर काढल्याने जीवितहानी टळली.

तळोजा येथील बी. जी. शिर्के कामगार वसाहतीमध्ये गॅस सिलेंडरमधून झालेल्या गळतीमुळे आगीची घटना घडल्याचे दिसून येते.

या आगीत कामगारांच्या मालमत्तेचे नुकसान झाले असून, कोणतीही जीवितहानी झाली नाही, असे कळंबोली अग्निशमन केंद्राचे अधिकारी फतेसिंग गायकवाड यांनी सांगितले.

## जुई व कामोठे येथे रस्ते बांधण्याची मागणी

### डॉ. अरुणकुमार भगत यांचा पालिकेकडे पत्रव्यवहार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे गावामध्ये सध्या सुरू असलेली गटार बांधणीची कामे अर्धवट असल्याबाबत व जुई व कामोठे गावातील रस्ते नव्याने बांधण्यात यावे, अशी मागणी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी पनवेल मनपा आयुक्तांकडे पत्रव्यवहार केला आहे.

डॉ. भगत यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे गावामध्ये मागील अनेक दिवसांपासून गटाराची बांधणी नव्याने करण्याचे काम सुरु असुन या कामादरम्यान खड्ड्याची खोदाई करण्यात आलेली आहे, परंतु अद्यापपर्यंत या गटारांचे काम पुर्ण झालेले नाही. खोदाई केली आहे तशीच आहे. त्यात गावातील रस्ते अरुंद असल्याकारणाने नागरिकांना रहदारीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कामोठे गावातील अर्धवट गटारांची कामे पूर्ण करणेदेखील आवश्यक आहे. तसेच जुई व कामोठे या गावातील अंतर्गत सर्वच रस्ते पुर्णपणे खराब झालेले आहेत. रस्ते नव्याने करणे अत्यंत आवश्यक आहे.



पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे गावामध्ये नव्याने उभारण्यात येत असलेल्या गटारांची अर्धवट कामे तातडीने पुर्ण करणे व कामोठे गाव व जुई गावातील अंतर्गत रस्ते नव्याने करून देऊन या परिसरातील नागरिकांना उपकृत करण्यात यावे, असे डॉ. भगत यांनी निवेदनात नमुद केले आहे.

## गुरूलिंगेश्वर मराठी प्रायमरी स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुरुलिंगेश्वर मराठी प्रायमरी स्कूल पनवेल वार्षिक स्नेहसंमेलन तथा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता.



इच्छापूर्ती गणेश मंदिरासमोरील मैदानात झालेल्या या समारंभाला भाजपचे अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात, माजी नगरसेवक प्रथमेश सोमण, महेश साळुंखे, सोने व्यापारी मदनलाल चपलौत, मनसोपचार तज्ञ डॉ.सिद्धेश परहर, शुभम फार्मा पनवेलचे प्रो प्रा दिलीप सिंघवी, पार्श्व वुमन्स संघटना अध्यक्ष बसंती जैन, प्रभाग क्रमांक २० शक्ती केंद्रप्रमुख राजूभाई बगाटे, शालेय समिती व्यवस्थापन अध्यक्ष रामजी तेकम, मुख्याध्यापक प्रवीण शिलवंत, संस्थापक सचिव यशवंतराव शंकरराव पाटील, कार्यकारी सचिव अभिजित पाटील, कार्यकारी अध्यक्ष आदित्य पाटील, शिक्षक वर्ग पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## करंजाडे वसाहतीमध्ये गतिरोधकाची कामे सुरू

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे वसाहतीमध्ये समाजसेवक आयु कुणाल लोंढे यांच्या प्रयत्न आणि पाठपुराव्याने करंजाडे वसाहतीमध्ये गतिरोधक बंधने व झेब्रा क्रॉसिंग पट्टे मारण्याचे काम सुरू झाले आहे.

करंजाडे वसाहतीमधील सेक्टर १ ते ६ या ठिकाणचे अपघात रोखण्यासाठी सदर ठिकाणी गतिरोधक उभारणे, झेब्रा क्रॉसिंग आणि फलक लावणे आदी कामे महत्वाची होती. या बाबत समाजसेवकी कुणाल लोंढे यांनी सिडको कार्यक्रारी अभियंता यांच्याकडे पत्र व्यवहार करून सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याची दखल सिडके घेत प्रत्यक्ष कमला सुरुवात केली आहे.



## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात टेक्नो ब्रिंक

**खारघर : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथे रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात माहिती व तंत्रज्ञान विभाग तसेच कम्प्युटर सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने २४ व २५ फेब्रुवारी रोजी टेक्नो ब्रिंक २०२५चे आयोजन केले होते.



या टेक्नो ब्रिंक २०२५चा प्रमुख हेतू विद्यार्थ्यांमधील तांत्रिक ज्ञानाला वाव देऊन त्याचा आधुनिक युगामध्ये जास्तीत जास्त वापर करणे हा होता. टेक्नो ब्रिंक २०२५ उद्घाटन ही करण्यात आले तसेच वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्यामध्ये प्रामुख्याने ट्रेझर हंट, डिबेट मॉडेल मेकिंग, काहुत क्विझ, डेबुगीग, एनएफएस, इत्यादी स्पर्धांचा समावेश होता. या सर्व स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील सुमारे ७० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व या स्पर्धेचा निकाल ही जाहीर करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी सर्व विजेतांना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले अभिनंदन केले.

या टेक्नो ब्रिंक २०२५ चे आयोजन प्रा. राजश्री म्हात्रे व रिजवाना मोमीन (विभाग प्रमुख माहिती व तंत्रज्ञान व कम्प्युटर सायन्स) यांनी केले तसेच माहिती व तंत्र विभागातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच प्रा. महेश धायगुडे, प्रा. सोनी पांडे, प्रा. गीतांजली ठाकूर, प्रा स्वाती, प्रा. मनीषा शिलेदार, प्रा. नीलम मोरे, प्रा. शुभम शर्मा, दीपक पवार, अनंत सावंत तसेच इतर सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## संपादकीय

# महिला सुरक्षा ऐरणीवर

पुण्यातील स्वारगेट बसस्थानकासारख्या कायम वर्दळ असलेल्या ठिकाणी घडलेली बलात्काराची घटना अवघ्या महाराष्ट्रासाठी धक्कादायकच आहे. त्यात हे कृत्य एका सराईत गुन्हेगाराने केल्याचे समोर आल्याने राज्यातील महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**पुण्यातील स्वारगेट बसस्थानकातील बलात्कार प्रकरणी पालकमंत्र्यांसह सर्वांनीच कठोर कारवाईची भूमिका घेतली आहे. पोलिसांची अनेक पथके आरोपीला पकडण्याच्या कामी लागली असून आरोपीची माहिती देणाऱ्यास एक लाख रूपयांचे बक्षीसही जाहीर करण्यात आले आहे. घटना उजेडात येताच संबंधित सर्व यंत्रणांकडून घटनेची गंभीर दखल घेतली जात असतानाच विरोधकांनी मात्र महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. पहाटेच्या वेळी स्वारगेट बसस्थानकात एका आडबाजूला उभ्या असलेल्या बसमध्ये बलात्काराची ही घटना घडल्याचे समोर आले आहे. संबंधित २६ वर्षीय तरुणी यापूर्वी अनेकदा पहाटेच्या बसने आपल्या गावी गेली आहे. त्या दुर्दैवी दिवशी मात्र तिने स्थानकात शिरल्यावर आरोपीकडे बससंबंधी चौकशी केली. 'ताई' म्हणत त्याने तिचा विश्वास संपादन करून आडबाजूच्या बसमध्ये जाण्यास सांगितले. बसमधील अंधारामुळे तरुणीला शंकाही आली. परंतु विश्वास ठेवून ती बसमध्ये चढली आणि तिथेच तिचे चुकले. आरोपीने धमकावून तिच्यावर दोन वेळा बलात्कार केल्याचे आता वैद्यकीय तपासातून समोर आले आहे. बसमधील छायाचित्रणावरून त्या परिसरात सर्रास गैरप्रकार सुरू होते असेही दिसते. बसस्थानकातील सुरक्षायंत्रणेने त्याकडे वेळीच लक्ष का दिले नाही हा मोठा प्रश्न आहे. तिथे अनेक बंद बसगाड्या वर्षानुवर्षे पडून आहेत. या बसगाड्यांमधूनच गैरप्रकार सुरू असल्याचे दिसते. एसटीचे सुरक्षारक्षक मोठ्या संख्येने तैनात असताना आणि संबंधित बस सुरक्षारक्षकांच्या केबिनपासून फारशी दूर नसताना अशी घटना घडते याला काय म्हणावे? घटना उजेडात येताच मात्र यंत्रणेने वेगाने कारवाई सुरू केली असून परिवहन मंत्र्यांनी तंत्रज्ञानाच्या वापरातून एसटीमध्ये जास्तीत जास्त सुरक्षा पुरवण्याचे आश्वासन दिले आहे. सरकारने राज्यातील महिलांना एसटीच्या तिकिटात सवलत दिली आहे. त्यांना सुरक्षाही पुरवावी अशी टीका विरोधकांनी केली आहे. पुण्यातील पोलिसांचा गुन्हेगारांना धाक वाटत नाही अशी भावनाही व्यक्त करण्यात आली. वास्तविक राष्ट्रीय महिला आयोगासह सर्व स्तरावर घटनेची गंभीर दखल घेतली गेली असून आरोपी लवकरच पकडला जाईल अशी अपेक्षा आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या दत्ता गाडे नामक या आरोपीस फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी होते आहे. आरोपी शिरुरचा असून त्याचे राजकीय कनेक्शन असल्याची टीकाही विरोधकांनी केली. परंतु कुठल्याही प्रकारचे राजकीय लागेबांधे असले तरी गुन्हेगाराची गय केली जाणार नाही. राज्यातील महिलांची सुरक्षा ही महायुती सरकारच्या दृष्टीने सर्वाधिक प्राधान्याची बाब आहे याची ग्वाही सत्ताधारी नेत्यांकडून देण्यात आली आहे. तरुणी वा महिलांनीही सार्वजनिक ठिकाणी अज्ञात व्यक्तींवर विश्वास टाकताना नीट विचार करावा हेही खरेच. संबंधित तरुणीने प्रतिकार का केला नाही, आरडाओरडा केला नाही अशा आशयाची विधाने एका नेत्याने केल्याचेही समोर आले आहे. अशा भीषण संकटसमयी एखाद्या तरुणीच्या भयभीत मन:स्थितीची कल्पना करता येत नाही. निव्वळ प्रतिकाराच्या खाणाखुणा न दिसण्यावरून कुठलेही निष्कर्ष काढणे असंवेदनशीलतेचे निदर्शक वाटते. अधिक तपशील पोलिस तपासात समोर येतीलच. गुन्हा सिद्ध झाल्यास आरोपीला कठोर शिक्षा होणे कायद्याचा धाक निर्माण होण्याच्या व महिला सुरक्षेच्या दृष्टीने गरजेचे आहे.**

# टेनिस बॉल क्रिकेटवर नियंत्रण हवे

## खबरबात
प्रकाश सोनवडेकर



रायगड जिल्ह्याची क्रीडा क्षेतात कबड्डीची पंढरी अशी ओळख आहे. या जिल्ह्याने अने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू दिले आहेत. कबड्डीचे कार्यकर्ते दिले आहेत. याच जिल्ह्यात हुतूतूचे कबड्डी झाले. रायगड जिल्ह्यात जिल्ह्यात प्रत्येक गावात गकड्डीचा संघ आहे. सर्वाधिक कबड्डी संघ असलेला रायगड जिल्हा आहे. या जिल्ह्यात दर शनिवार – रविवारी कबड्डीची स्पर्धा आयोजित केली जाते. मोठमोठी पारितोषिके दिली जाता. परंतु आता परिस्थिती हळुहळू बदलू लागली आहे. कबड्डी ऐवजी टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांची संख्या वाढू लागली आहे. परंतु या स्पर्धांवर कुणाचे नियंत्रण नसते. त्यामुळे विस्कळीत पणा असतो.

पूर्वी उरण, पनवेल या तालुक्यांमध्ये टेनिसबॉल नाईट क्रिकेट स्पर्धा जास्त होत असत. आता प्रत्येक तालुक्यात या स्पर्धा होत आहेत. टेनिसबॉल नाईट क्रिकेट स्पार्धा घेण्यात विरोध असण्याचे कारण नाही. त्यावर नियंत्रण मात्र हवे. प्रत्येक मोसमात या स्पर्धामधून करोडो रूपयांची उलाढला होते. या स्पर्धांमुळे टेनिस क्रिकेट खेळणार्या गावखेड्यातील खेळाडूना पैसे मिळत आहेत. स्पर्धाचे आयोजन भव्यदिव्य असते परंतु या स्पर्धांच्या आयोजनावर कुणाचे नियंत्रण नसते. विस्कळीत पण असतो. भविष्यातीत टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धाचे प्रामाण वाढणार आहे. त्यामुळे यांच्यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा प्रत्येक जिल्ह्यात असली पाहिजे. ती काळाची गरज आहे.

रायगड जिल्हा हा कबड्डीची पंढरी म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात पूर्वी दर रविवारी कबड्डी स्पर्धा होत असत. गवात कबड्डी स्पर्धा असली की त्या गवत उत्सवाचे वातवरण असायचे . प्रत्येक घरात एक संघ असायचा. त्या घरवर संघाची जबादारी असायची. ही परीस्थित आता बदलतेय. रायगड जिल्ह्यात अगदी पेण आणि अलिबाग या दोन तालुक्यांमध्ये देखील टेनिस क्रिकेटचे प्रमाण वाढले आहे. ज्या गावांमध्ये पूर्वी रात्री तरुण कबड्डीचा सराव करीत असत प्रमाण आता हळूहळू कमी होऊ लागले आहे. रायगड जिल्ह्यात गावोगावी टेनिबॉल क्रिकेट स्पर्धांचे आयोजिन केले आत आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून भव्य चषक आणि लाखो रुपयांची बक्षिसे दिली जात आहे. कार, मोटारसायकल अशी वैयक्तीक बक्षीसे दिली जात आहेत.

पूर्वी क्रिकेट स्पर्धा दिवसा होत असत. आता रात्री विद्युतप्रकाश झोतात क्रिकेट स्पर्धा खेळविण्याचे प्रमणा वाढले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, हे या स्पर्धांचे वैशिष्ट्य ठरत आहे. आयपीएलच्या धर्तीवर निरनिराळ्या संघाची निवड करून भव्य क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले जात आहे. भले मोठे क्रिडांगण, प्रेक्षक गॅलरी, स्पर्धेचे थेट प्रक्षेपण, रिव्ह्यू घेण्याची सुविधा अशा सुविधा जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये प्रथमच उपलब्ध करून देण्यात येत आहेत. रात्रदिवस चालणार्या या स्पर्धांना खेळाडू आणि प्रेक्षकांचाही उंदड प्रतिसाद मिळतांना दिसतो आहे. हा खेळ आता लोकप्रिय होऊ लागलाय.

पूर्वी अलिबागमध्ये क्रीडाभूवनतर्फे २९ ते ३१ डिसेंबर या कालावधीत टेनिसबॅनल नाईट क्रिकेट स्पर्धा आयोजित केली जायची. ही स्पर्धा मानाची मानली जायची. खेळाडू या स्पर्धेची वाट पहायचे. ती स्पर्धा बंद झाली तरी इतर स्पर्धा मात्र वाढल्या आहेत. अलिबागमध्येच प्रशांत नाईक मित्रमंडळाले अलिबागच्या क्रिडा भुवन मैदानावर तीन दिवसी नाईट क्रिकेट लीग स्पर्धेचे आयोजन केले होते. यानंतर माजी आमदार स्व. मधुकर ठाकूर यांच्या कुटूंबाच्या वतीनेही माजी आमदार स्व. मधुकर ठाकूर (पप्पा) चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शेतकरी कामगार पक्ष आणि पुरोगामी युवक संघटनेच्या पीएनपी चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले . दिलीप भोईर यांनीही साई क्रिडा मंडळाच्या वतीने झिराड येथे अलिबाग प्रिमिअर लीग स्पर्धेचे आयोजन केले . शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांची आमदार चषक क्रिकेट स्पर्धा ५ ते १० मार्च या कालाधीत होणार आहे. या केवळ अलिबाग तालुक्यतील मोजक्या क्रिकेट स्पर्धा आहेत. अन्य तालुक्यांमध्ये देखील अशा स्पर्धा होत असतात.

नाईट क्रिकेट स्पर्धा होताच त्याचबबरोबर दिवसा खेळवल्या जाणार्या टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धांची संख्या देखील वाढत आहे. या स्पर्धांच्या आयोजनामुळे स्थानिक खेळाडूंना आपली चुणूक दाखवण्याची संधी तर मिळतेच आहे. त्याच बरोबर ज्या संघातून खेळाडू खेळत आहेत. त्या संघव्यवस्थापनाकडून त्यांना चांगला मोबदलाही दिला जातो आहे. त्यामुळे खेळाडूही खूश असतात.

हे जरी खर असल तरी या स्पर्धांमध्ये विस्कळीतपणा असतो. कुणाच नियंत्रण नसत. स्पर्धा आयोजनासाठी कुणाची परवानगी घ्यावी लागत नाही. आयोजक ठरवतील ते प्रवेश शुल्क. प्रत्येक स्पर्धेचे नियम वेगळे असतात. भविष्यात टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धां वाढणार आहे. लेदर बॉल प्रमाणे टेनिस बॉलच्या राष्ट्रीय स्पर्धा होतील. त्यासाठी राज्याचा संघ निवडावा लागेल. जिल्ह्याचा संघ निवडावा लागेल. भविष्याचा विचार करता टेनिस बॉल क्रिकेटवर नियंत्रण ठेवणारी उभी करावी लागणार आहे.

# प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ सी.व्ही. रमन

सी.व्ही. रमन हे एक प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ होते ज्यांनी रमन इफेक्टचा शोध लावला होता, ज्यामध्ये रेणूंद्वारे विखुरल्यावर प्रकाशाची वारंवारता कशी बदलते हे स्पष्ट केले आहे. सी.व्ही. रमन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी तामिळनाडूतील तिरुचिरापल्ली येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना शिक्षणात खूप रस होता आणि त्यांचे वडील, भौतिकशास्त्र आणि गणिताचे व्याख्याते होते, त्यांनी त्यांची उत्सुकता वाढवण्यात मोठी भूमिका बजावली. रमन यांनी मद्रासमधील प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये शिक्षण घेतले, पुढील अभ्यासासाठी त्यांचे लक्ष भौतिकशास्त्राकडे वळले.

त्यांना संगीताची आवड होती आणि त्यांनी पारंपारिक भारतीय वाद्यांचे ध्वनिकी अभ्यासले. १९२९ मध्ये, विज्ञानातील योगदानाबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांना नाइट ही पदवी दिली. २१ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन होईपर्यंत त्यांनी त्यांचे संशोधन आणि शैक्षणिक



कार्य चालू ठेवले. २८ फेब्रुवारीला त्यांनी लावलेल्या शोधामुळे भारत सरकारने १९८६ मध्ये तो दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन घोषित केला दरवर्षी तो साजरा केला जातो

सी.व्ही. रमन यांनी भौतिकशास्त्राच्या क्षेत्रात, विशेषतः प्रकाशाच्या अभ्यासात मोठी प्रगती केली. १९२८ मध्ये त्यांनी एक अभूतपूर्व शोध लावला, ज्याला आता रमन इफेक्ट म्हणून ओळखले जाते. या परिणामामुळे प्रकाश एखाद्या पदार्थातून जातो तेव्हा त्याची तरंगलांबी कशी बदलते हे दिसून आले. त्यांचा शोध क्रांतिकारी होता आणि त्याने प्रकाश आणि स्पेक्ट्रोस्कोपीच्या अभ्यासात नवीन मार्ग उघडले.

१९३० मध्ये, सी.व्ही. रमन हे रमन इफेक्टवरील त्यांच्या कामासाठी भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक जिंकणारे पहिले आशियाई बनले. या शोधामुळे त्यांना जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आणि प्रकाश वेगवेगळ्या पदार्थांशी कसा संवाद साधतो याची समज मोठ्या प्रमाणात वाढली.



## बदलते तंत्रज्ञान

### जी मेलचा पासवर्ड रिसेट करताना असणार नवीन सिस्टम

आपल्यातील बऱ्याच जणांना जीमेल (Gmail)चा पासवर्ड लक्षातच राहत नाही. मग आपण पासवर्ड रिसेट करतो. तेव्हा आपल्या एसएमएसमध्ये एक ओटीपी (OTP) येतो आणि मग तो पासवर्ड (Password) टाकून आपण जीमेलमध्ये लॉगिन करून शकतो. तुम्हीही अशाच पद्धतीने जीमेल प लॉगिन करत असाल तर तुमच्यासाठी एक वाईट बातमी आहे. गूगल जीमेलमधील टू-फॅक्टर-ऑथेंटिकेशन सिस्टममध्ये बदल करत आहे. त्यामुळे यापुढे आपल्याला एसएमएसवर ओटीपी येणार नाही. ही पद्धत युजर्सना त्यांची ओळख पटवून देण्यासाठी करण्यासाठी एक पर्याय होता. पण, त्यात सुरक्षा धोके सुद्धा जाणवू लागले. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

जीमेलचे (Gmail) स्पोक्सपर्सन यांनी फोर्ब्सला स्पष्ट केले की, हा निर्णय घेण्यामागे जागतिक स्तरावर एसएमएसचा दुरुपयोग कमी करणे हे उद्दिष्ट आहे. त्यामुळे आतापसून जीमेल क्यूआर कोड (त्रेसश्रश ठ) कोड लागू करेल. म्हणजेच फोन नंबर टाकून कोड प्राप्त करण्याएवजी युजर्स त्यांच्या स्मार्टफोनसह क्यूआर कोड स्कॅन करतील. ही पद्धत अजूनही स्मार्टफोनवर अवलंबून असली तरीही एसएमएसपासून युजर्सना दूर ठेवेल.

१. गुन्हेगार मोबाइल युजर्सना फसवून फोन नंबर वेगळ्या डिव्हाइसवर स्विच करून संदेश येणे थांबवू शकतात.

२. ट्रॅफिक पंपिंग नावाच्या योजनेद्वारे सिस्टीम exploit देखील करू शकतात, जे त्यांना प्रदात्यांशी त्यांच्या नियंत्रित असलेल्या नंबरवर एकाधिक ड्चड संदेश पाठविण्यास सक्षम करते, ज्यामुळे त्यांना प्रत्येक मजकूरातून फायदा होऊ शकतो.

**एलॉन मस्ककडूनही कौतुक**


युजर्सच्या पडताळणीसाठी मोठ्या प्रमाणावर कंपनी पाठवलेल्या एसएमएसची संख्या पाहता, हे स्पष्ट झाले आहे की एसएमएसमध्ये महत्त्वपूर्ण धोके उद्भवू शकतात. त्यामुळे क्यूआर कोडचा निर्णय गूगलकडून घेण्यात आला आहे.

# पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद

डॉ. राजेंद्रप्रसाद सहाय हे नेते आणि भारतीय प्रजासत्तकाचे पहिले राष्ट्रपती (१९५०–६२). त्यांचा जन्म बिहारच्या सारन जिल्ह्यातील जीरादेई या खेड्यात श्रीवास्तव नामक सुखवस्तू कुटुंबात झाला. त्यांचे आजोबा चौधुरलाल हे हथवा संस्थानाचे दिवाण होते. वडील महादेव सहाय हे समाजसेवा करीत. ते युनानी व आयुर्वेदीय औषधोपचार करणारे हौशी वैद्य होते. आई कमलेश्वरीदेवी धार्मिक वृत्तीची होती. तिच्या संस्कारांचा प्रभाव राजेंद्रबाबूंच्या जीवनावर अखेरपर्यंत होता.

राजेंद्रप्रसादांचे प्राथमिक शिक्षण मौलवींतर्फे घरीच पारंपारिक पद्धतीने झाले. त्यात उर्दू आणि फार्सी या भाषाशिक्षणावर अधिक भर होता. पुढे छपरा, हथवा व पाटणा या ठिकाणी शालेय शिक्षण घेऊन त्यांनी कलकत्त्यातील प्रेसिडेन्सी महाविद्यालयांतून पदव्या मिळविल्या. मॅट्रिकपासून पदवीपर्यंत त्यांनी पहिली श्रेणी सोडली नाही. विद्यार्थीदशेतच त्यांनी स्वदेशी व लोकसेवेचे व्रत घेतले.

सुरुवातीस काही वर्षे त्यांनी अध्यापनाचे काम केले आणि नंतर कलकत्ता उच्च न्यायालयात वकिलीस प्रारंभ केला बिहारच्या १९१७ च्या चंपारण्य सत्याग्रहाच्या वेळी महात्मा गांधींशीं त्यांचा परिचय वाढला. त्यांनी



## निमित्त

म. गांधींच्या चतुःसूत्रीचा पुरस्कार केला आणि वकिली व्यवसाय सोडला. पाटण्यात त्यांनी राष्ट्रीय विद्यापीठ स्थापून स्वदेशी, मद्यपानबंदी, खादीचा प्रसार इ. कार्यक्रम हाती घेतले. १९३० च्या कायदेभंग चळवळीत राजेंद्रबाबूंचा महत्त्वाचा वाटा होता. त्यांना दोनदा तुरुंगवास भोगावा लागला. तीन वेळा कॉँग्रेसचे हंगामी अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली परंतु ब्रिटीश सरकारने बेकायदा अध्यक्ष म्हणून त्यांना पुन्हा पंधरा महिने कारावासात टाकले. तिथे त्यांचा दम्याचा विकार वाढला. बिहारमध्ये १९३४ साली फार मोठा भूकंप झाला. त्यावेळी त्यांची सुटका झाली. प्रकृतीची पर्वा न करता ते रात्रंदिवस गोरगरिबांसाठी खपले. १९३४ च्या मुंबई कॉँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. त्यानंतरच्या छोडो भारत आंदोलनात ते सहभागी झाले (१९४२). त्यावेळी त्यांची बंकीपूरच्या तुरुंगात रवानगी झाली. तिथून १५ जून १९४५ रोजी ते सुटले.

पं. जवाहरलाल नेहरूंनी २ सप्टेंबर १९४६ रोजी हंगामी सरकार बनविले. या राष्ट्रीय मंत्रीमंडळात अन्नमंत्री म्हणून राजेंद्रबाबूंचा समावेश झाला. त्यानंतर ९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समिती स्थापण्यात आली व राजेंद्रप्रसाद यांची एकमताने अध्यक्ष म्हणून निवड झाली. या समितीने तीन वर्षांच्या परिश्रमानंतर भारताची राज्यघटना मंजूर केली. त्यानुसार प्रजासत्ताक भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून राजेंद्रबाबूंचा शपथविधी झाला (१९५०). त्यांनी राष्ट्रपती भवनातील शाही राहणीमानात आमूलाग्र बदल केला. तेथील विशाल उद्यान जनतेसाठी खुले केले. या पदावर ते निवृत्त होईपर्यंत म्हणजे १० मे १९६२ पर्यंत होते संधिवाताने त्यांच्या पत्नीचे निधन झाले (१९६२). यांमुळें ते खचले. त्यातच पाटण्यात त्यांचे २८ फेब्रुवारी १९६३मध्ये निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### साखरेऐवजी खजूर खा; रोगप्रतिकारक शक्ती वाढेल!

खजूर हा एक अतिशय पौष्टिक आणि चविष्टसुकामेवाआहे. यामध्येअसलेले फायबर, लोह, पोटॅशियम आणि जीवनसत्त्वे शरीराला ऊर्जावान आणि निरोगी ठेवण्यास मदत करतात. दररोज खजूर खाण्याचे अनेक फायदे आहेत. हाडे आणि पचनसंस्था मजबूत करण्यासोबतच ते हृदयालाही निरोगी ठेवते. खजूरमध्ये कार्बोहायड्रेट्स, फायबर, प्रथिने, व्हिटॅमिन बी, कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम, पोटॅशियम, जस्त आणि मँगनीज असे अनेक पोषक घटक असतात.



खजूरमध्ये जवळजवळ सर्व आवश्यक पोषक घटक असतात, जे एकूण आरोग्यासाठी फायदेशीर असतात. त्यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स धमनीच्या पेशींमधून खराब कोलेस्ट्रॉल काढून टाकण्यास मदत करतात. तर पोटॅशियम आणि मॅग्नेशियम हृदय निरोगी ठेवतात.

याशिवाय, खजूर खाल्ल्याने पोट बराच वेळ भरलेले राहते, ज्यामुळे खाण्याची इच्छा कमी होते. अशाप्रकारे वजन कमी करण्यासाठी खजूर देखील उपयुक्त ठरतात. खजूरमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते, जे पचनसंस्था मजबूत करते. हे लोहाचा एक उत्तम स्रोत आहे, जो शरीरातील रक्ताची कमतरता भरून काढतो. यामध्ये असलेले कॅल्शियम, फॉस्फरस आणि मॅग्नेशियम हाडे आणि स्नायू मजबूत करतात. डॉ. अमृता मिश्रा म्हणतात की खजूर खाल्ल्याने मन ताजेतवाने राहते. त्यात अनेक पोषक घटक असतात, जे मेंदूसाठी फायदेशीर असतात. खजूरमध्ये ग्लुकोज आणि फ्रुक्टोज सारखे नैसर्गिक साखर असते, जे मानसिक ताण कमी करते आणि मेंदूला अधिक सक्रिय ठेवते.

खजूर खाण्याची योग्य वेळ सकाळी रिकाम्या पोटी असते. यासाठी रात्री खजूर पाण्यात भिजवा आणि सकाळी रिकाम्या पोटी खा. पाण्यात भिजवून खाल्ल्याने ते पचायला सोपे होते. तथापि, सुक्या खजूर देखील खाऊ शकतात. याशिवाय तुम्ही रात्री दुधासोबत खजूर देखील खाऊ शकता. डॉ. अमृता मिश्रा म्हणतात की दररोज दोन ते तीन खजूर खाणे शरीराला आवश्यक पोषक तत्वे प्रदान करण्यासाठी पुरेसे आहे. जर पचनसंस्था चांगली असेल तर तुम्ही ४–५ खजूर देखील खाऊ शकता. पण यापेक्षा जास्त खाऊ नये.

# पालक सचिव डॉ. गोविंदराज यांचा रायगडात क्षेत्रीय पाहणी दौरा

## ◆ विद्यार्थी, शेतकरी, क्षेत्रिय अधिकारी यांच्याशी साधला संवाद

**रायगड : रामप्रहर वृत्त**

केंद्र व राज्य शासनामार्फत सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध योजना राबविण्यात येत असतात तसेच जिल्हा प्रशासन देखील जिल्ह्याच्या विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असते. जिल्ह्यात या उपक्रमांची सुरू असलेली अंमलबजावणी, लाभार्थ्यांना होणारा फायदा, त्यामुळे झालेला बदल व एकूणच या योजनांची फलश्रुती याची प्रधान सचिव नगरविकास (२) तथा रायगड जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. के.एच गोविंदराज यांनी गुरुवारी (दि. २७) प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला.

पालक सचिव डॉ. गोविंदराज यांनी रायगड जिल्हा प्रशासनाची आढावा बैठक घेतली. तत्पूर्वी त्यांनी क्षेत्रीय पाहणी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी जिल्हा परिषद शाळा, पांढरा कांदा उत्पादक शेतकरी, कांदा बियाणे निर्मिती उपक्रम, सामाजिक वनीकरण बांबू रोपवाटिका येथे भेट देऊन पाहणी केली तसेच संबंधितांशी संवाद साधुन त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे, उपसचिव सुशिला पवार, कक्ष अधिकारी अर्जुन लांडगे यांच्यासह विविध विभाग प्रमुख उपस्थित होते.

सर्वप्रथम रायगड जिल्हा परिषद मॉडेल स्कूल वायशेत, (ता. अलिबाग) येथे पालक सचिव डॉ. गोविंदराज यांनी भेट दिली. या वेळी त्यांनी शाळेतील शासकीय योजनांची पाहणी केली व माहिती मुख्याध्यापक महेश ठाकूर यांच्याकडून घेतली. यामध्ये व्हर्च्युअल क्लासरूम, रोबोटिक व कोडिंग लॅब, डिजिटल क्लासरूम, अटल टिंकरिंग लॅब यासोबत शाळेतील अनेक उपक्रमांची माहिती घेतली.



अब्दुल कलाम लॉन्च वेहिकल मिशन २०२१ उपग्रह निर्मिती व प्रक्षेपण ही मोहीम डॉ. एपीजे अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाउंडेशन रामेश्वरम यांच्यातर्फे आयोजित केली होती. या राष्ट्रीय मोहिमेमध्ये रायगड जिल्हा परिषदेच्या तीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. जिल्हा परिषद सेस फंडातून या विद्यार्थ्यांना तामिळनाडू राज्यातील पट्टीपुलम येथे प्रक्षेपणास उपस्थित राहण्यासाठी अनुदान दिले गेले होते. त्यामध्ये तीन विद्यार्थ्यांसह शाळेतील दोन शिक्षक व मुलांचे पालक सहभागी झाले होते. याची सविस्तर माहिती बबिता चौहान हिने दिली. पालक सचिव गोविंदराज यांनी याबाबत विशेष कौतुक केले.

अटल ट्विंकरिंग लॅब, रोबोटिक लॅब, डिजिटल क्लासरूमला गोविंदराज यांनी प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. प्रयोगशाळेचे कार्य कसे चालते? कोणते साहित्यामध्ये कोणते तत्व आहे? याबद्दल विद्यार्थ्यांकडून माहिती समजून घेतली व रोबोटिक्स आणि कोडिंग लॅबमध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मॉडेलचे सादरीकरण पाहिले. डिजिटल क्लासरूममध्ये विद्यार्थ्याला दिलेले संगणक प्रत्यक्ष हाताळता येते का याची माहिती घेतली. अफसर सदफ शेख हिने स्वयं अध्ययनात याचा प्रत्यक्ष वापर कसा होतो हे सांगितले.

जिल्हा परिषदेच्या वतीने इयत्ता पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत बसलेल्या विद्यार्थ्यांची फी जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून भरण्यात येते. रायगड टॅलेंट सर्च या नाविन्यपूर्ण व अनोख्या माध्यमातून इयत्ता तिसरीपासून आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे विशेष वर्ग, सराव चाचण्या व रात्रीच्या निवासी कार्यशाळा घेण्यात आलेले आहे. त्याचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना होत आहे. अनेक शाळांमध्ये डिजिटल क्लासरूम, सोलर पॅनल बसविण्यात आले आहेत. व त्यांचा उपयोग चांगला होत आहे, असे पुनिता गुरव शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी सांगितले. जिल्हा परिषदेच्या या उपक्रमाबद्दल गोविंदराज यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांचे विशेष कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार बांबू क्षेत्र व उत्पादनात वाढ करण्यासाठी रायगड जिल्हाधिकारी यांनी विशेष बांबू रोप निर्मिती मोहीम घेतली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत बांबू रोपांची निर्मिती करण्याचा नाविण्यपूर्ण प्रयोगाची पाहणी सामाजिक वनीकरणच्या रोपवाटिकेस भेट देऊन केली. जिल्ह्यात रोहा वनविभागाच्या पाच रोपवाटिका, अलिबाग वनविभागांच्या १५ रोपवाटिका, सामाजिक वनीकरण विभागाच्या १३ रोपवाटिका आणि कृषी विभागाच्या सात रोपवाटिका अशा एकूण ४० रोपवाटिकांमध्ये २८ लाख बांबू रोपे लागवडीचे काम सुरू करण्यात आले आहे. राज्यात बांबू रोपवाटिका तयार करणारा रायगड हा एकमेव जिल्हा आहे. निर्धारित उद्दिष्ट वेळेत पूर्ण करून बांबू आधारित उद्योगास चालना द्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला आंतरराष्ट्रीय भौगोलिक मानांकन मिळाले आहे. कार्लेखिंड परिसरात सागाव येथील कांदा उत्पादक शेतकरी सतीश पाटील यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली.

### *वरसोली, जि.प.तही भेट*

***वरसोली समुद्रकिनारा येथे भेट देऊन स्वच्छतेसाठी येणाऱ्या बीच क्लीनिंग मशीनची पाहणी केली. जिल्ह्यातील सर्व समुद्रकिनारे स्वच्छ व सुंदर ठेवावेत, अशा सूचना या वेळी त्यांनी दिल्या. जिल्हा परिषद रायगड येथे भेट देऊन नूतन कार्यालयाची पाहणी आणि एक्स रे मशीनची पाहणी केली. शेष फंडातून दिव्यांग बांधवाना दिलेल्या मोबाईल ई-शॉपला (फिरत्या वाहनावरील दुकान) भेट देऊन पालक सचिवांनी संवाद साधला.***

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर तीन वाहनांचा विचित्र अपघात

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर रात्री एका ट्रेलरने समोरील अज्ञात वाहनाला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला तर त्या ट्रेलरला पाठीमागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रेलरने जोरदार धडक दिल्याने तीन वाहनांचा भीषण अपघात झाला. या अपघातात कोणीही जखमी झाले नाही.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर आज रात्री वारद गावाजवळ एका ट्रकला भीषण आग लागल्याने एक्सप्रेसवेवर वाहतूक थांबवली होती, मात्र एक्सप्रेसवेवरून पाठीमागून भरधाव वेगात येणाऱ्या चौदा चाकी ट्रेलर चालक अनील जगन्नाथ किरवे (वय ५४, रा. खटाव ता. सातारा) हा घेऊन जातं असताना त्याचे ट्रेलर वरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील थांबलेल्या अज्ञात वाहनाला पाठीमागून जोरदार धडक दिली, तर त्याच्या पाठीमागून येणाऱ्या दुसरा ट्रेलर याच्या चालकाचे ट्रेलर वरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील ट्रेलरला जोरदार धडक दिल्याने तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला.



या अपघातात कोणीही जखमी झाले नसून दोन्ही अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या साहाय्याने रस्त्याच्या बाजूला घेऊन रस्ता वाहतूकिसाठी चालू करण्यात आला आहे.

# विळे-भागाड येथे दोन लाख ७२ हजारांची घरफोडी, चोरटा फरार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील विळे-भागाड येथे घरफोडी करून २ लाख ७२ हजार रुपयांचा ऐवज चोरून अज्ञात चोरटा फरार झाला आहे. याबाबत माणगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एमएसएल कॉलनी विळे-भागाड येथील रूम नं.११२ एम २ येथे फिर्यादी राजकुमार शंभरकर हे राहत असलेल्या घराचा कडी कोयंडा तोडून घरात बेडरूममधील लोखंडी कपाट् तोडून कपाटातील २ लाख २५ हजार रुपये किमतीचे ५ तोळे सोन्याचे मंगळसूत्र ,२२ हजार ५०० रुपये किमतीचे ५ ग्राम वजनाचे २ सोन्याचे कानातील टॉप्स,२२ हजार ५०० रुपये किमतीचे ५ ग्राम वजनाचे २ सोन्याचे कानातील टॉप्स, रोख २००० रुपये असा एकूण २ लाख ७२ हजार रुपयांचा ऐवज चोरून अज्ञात चोरटा फरार झाला आहे.

तसेच रूम नं. १०६ मधील नित्यानंद मिश्रा व एम १ इमारतीमधील रूम नं.१ मधील डिस्पेंसरी रूमचा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला असून रूम नं.१०३, १०९ ,१११ तसेच एमएच ०३ मधील रूम नं.१०५ च्या रूमचे देखील कडी कोयंडा तोडून घरफोडी करून चोरी करण्याचा प्रयत्न केला.

या गुन्ह्याप्रकरणी अज्ञात चोरट्या इसमावर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राठोड हे करीत आहेत

# 'टाटा स्टील फाऊंडेशनचा महिलांना दिशा देण्याचा उपक्रम म्हणजे महिला सक्षमीकरण'

**चौक : प्रतिनिधी**

टाटा स्टील फाऊंडेशनचा दिशा कार्यक्रम म्हणजे महिलांना दिशा देण्यासाठी आवश्यक व जनजागृती करणारा कार्यक्रम आहे. अशा कार्यक्रमाने महिलांना सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्यासाठी मार्ग मिळेल, असे कौतुकास्पद उदगार खालापूर पोलिस निरीक्षक सचिन पवार यांनी काढले.




टाटा स्टील फाऊंडेशन यांच्या वतीने खालापूर तालुक्यातील सर्वच घटकातील महिलांना बारा दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. यात ११७ महिलांनी भाग घेतला.या दिशा मॉड्यूल्स मध्ये लिंग आणि महिलांच्या नेतृत्वावर, स्थानिक स्वराज्य संस्था यात महिलांची भूमिका आणि नेटवर्किंग तसेच सामूहिक आवाजांसाठी एकजूट,वकिली कौशल्य,महिलांची एकजूट,यांचा समावेश असलेल्या कार्यक्रमाच्या समारोप समारंभात वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार बोलत होते.

रतनजी टाटा यांच्या समाजाप्रती असलेली भावना आणि पर्यावरण संतुलन करण्याची संकल्पना आज राबविण्यात येत आहे, देशात टाटा समूहाच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्य देशात राबविण्यात आले आहेत, दिशा कार्यक्रमाच्या माध्यमांतून महिला उंच झोका घेतील असे जेष्ठ सामाजिक व आदिवासी समाजासाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या डॉ वैशाली पाटील यांनी सांगितले.

'हिंसेला नकार द्या' या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश महिलांमध्ये बालविवाह, दारूबंदी, बालगर्भधारणा, घरगुती हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारा छळ, गैरवापर, मुलींचे शिक्षणातून गळती आणि महिला तस्करी यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर जागरूकता निर्माण करणे, लिंग हिंसाचाराच्या मूळ कारणांबद्दल जागरूकता निर्माण करणे, लिंग आणि लिंग-संबंधित नियमांमधील फरक आणि बदललेल्या मानसिकतेद्वारे सामाजिक नियम बदलण्याची महिलांची क्षमता ओळखणे यासारख्या अभ्यासपूर्ण चर्चांचा समावेश असतो.

यामुळे त्यांच्या समुदायांमध्ये पितृसत्ताकता आणि महिलांवरील हिंसाचार दूर करण्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यास मदत होईल. कार्यक्रमाचे आयोजन टाटा स्टील फाऊंडेशन चे प्रमुख भावेश रावल यांनी केले तर प्रास्ताविक हेमाद्री यांनी केले.

# विजयभूमी युनिव्हर्सिटीने केले जामरंग २०२५सह युथ, टॅलेंट आणि इनोव्हेशन

**कर्जत : प्रतिनिधी**

भारतातील पहिली उदारमतवादी व्यावसायिक युनिव्हर्सिटी विजयभूमी युनिव्हर्सिटीने कर्जत येथील युनिव्हर्सिटीमध्ये पहिला इंटर-कॉलेज टॅलेंट फेस्ट 'जामरंग २०२५' चे आयोजन केले होते. देशभरातील चाळीसहून अधिक प्रख्यात संस्थांनी सहभाग घेतला होता.



यामध्ये विविध विषयांवर आधारित उत्साहवर्धक स्पर्धांचा समावेश होता, ज्यामुळे विद्यार्थ्यांना संगीत, व्यवसाय, नाट्य, तंत्रज्ञान, रोबोटिक्स आणि डिझाइनमधील त्यांचे कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली जामरंग मध्ये विविध युनिव्हर्सिटीज मधून एकूण १४० जणांनी सहभाग घेतला होता.यामध्ये बॅटल ऑफ बॅण्ड्स, सोलो सिंगिंग कॉम्पीटिशन, रोबो रेस अँड लाइन फॉलोअर रोबोट, स्ट्रीट प्ले फिस्टा (नुक्कड नाटक), व्हिडिओनिक्स (व्हिडिओ क्रिएशन कॉम्पीटिशन), जेन एआय/एमएल हॅकेथॉन, हॅकथॉन: बिझनेस आयडिया पिच, डिझाइन स्प्रिंट या प्रामुख्य स्पर्धा होत्या. या वेळी प्रख्यात आर्टिस्ट्स ओशो जैन उपस्थित होते

# पशुसंवर्धन प्रशिक्षण आणि संपर्क मेळावा

अलिबाग : रामप्रहर वृत्त

रायगड जिल्ह्यामध्ये केंद्र पुरस्कृत ॲस्कॅड योजने अंतर्गत माहिती प्रशिक्षण व संपर्क घटक योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय माहिती प्रशिक्षण व संपर्क मेळाव्याचे आयोजन पंचायत समिती पनवेल येथे दिनाक २८ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे.

या मेळाव्यासाठी डॉ. प्रशांत कांबळे, प्रादेशिक सहआयुक्त (पशुसंवर्धन) उपस्थित राहून पशुपालकांना व विभागातील अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्यास जास्तीत जास्त पशुपालकांनी उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**कार्यकारी अभियंता, (विद्युत) यांचे कार्यालय**
**रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड,**
**सार्वजनिक बांधकाम आवार-पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन-४०२१०७**

Email: elraigad.ee@mahapwd.gov.in/elraigad.ee@gmail.com
Website: www.mahapwd.gov.in

दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८

**जा क्र. का.अ./राविवि/निविदा-१/ ६८२/ सन २०२५** **दिनांक: २४.०२.२०२५**

**ई-निविदा सुचना क्र. २८ सन २०२४-२५**

संदर्भ :
१. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८
२. मा. मुख्य अभियंता, सा.बां. विभाग कोकण, मुंबई यांचे पत्र क्र.मु.अ. (को)/विद्युत/४९२८/२०२४ दि.१८.१२.२०२४
३. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र. १०४/इमा-२ दिनांक १४.०२.२०२५

**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन कोड-४०२१०७ दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८** हे संदर्भाचे अधिन राहुन महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील नोंदणीकृत अनुज्ञाप्तीधारक कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा, ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **मा. अधिक्षक अभियंता (विद्युत), मुंबई प्रादेशिक विद्युत मंडळ, सा.बां. मुंबई (अ.क्र.२) व कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड (अ.क्र. १,३,४,५)** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक / ठेकेदारांचा वर्ग /इसारा रक्कम / कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| | **तृतीय मागणी** | | | | |
| १ | **RAESD/OW/216/2024-2025** Providing CCTV System, Internal Electrification, Area Lighting Work, Water Pump, Solar Rooftop System 5KVA, Proposed WORKSHOP building BATU Lonere, Dist -Rigad (Sub Work 1 to 5) | रु. ५२,६६,९१३/- | दिनांक २८.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक ०५.०३.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही. २) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रु. ५२७००/- ४) निविदा शुल्क रु. १०००/- अधीक GST | दिनांक ०७.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| | **द्वितीय मागणी** | | | | |
| २ | **RAESD/OW/155/2024-25** Providing Internal EI, External EI, Solar On-Grid system, Water pumps, DG set, CCTV system, Lift, Fire Fighting system at Revenue Bhavan Mahad, Dist-Raigad. | रु. १,६६,९८,८९७/- | दिनांक २८.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक ०५.०३.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही. २) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रु. १५००००/- ४) निविदा शुल्क रु. १०००/- अधीक GST | दिनांक ०७.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| ३ | **RAESD/OW/214/2024-2025** Providing CCTV System, Internal Electrification, AC, Area Lighting Work, Water Pump, Solar Rooftop System 5KVA. Proposed Girl's hostel and skill center building BATU Lonere, Dist -Rigad. | रु. ५६,७६,१११/- | दिनांक २८.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक ०५.०३.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही. २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रु. ५६८००/- ४) निविदा शुल्क रु. १०००/- अधीक GST | दिनांक ०७.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| ४ | **RAESD/OW/213/2024-2025** Providing CCTV System, Internal Electrification, AC. Area Lighting Work and Water Pump, Solar Rooftop System 5KVA, Proposed PG Research center building BATU Lonere, Dist-Raigad. | रु. ४१,४६,५६८/- | दिनांक २८.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक ०५.०३.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही. २) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रु. ४१५००/- ४) निविदा शुल्क रु. ५००/- अधीक GST | दिनांक ०७.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| | **प्रथम मागणी** | | | | |
| ५ | **RAESD/CR/2097/2024-25** Providing Annual Maintenance Contract (AMC) of 1 No 16.5 TR Air-cooled Cond. Units with AHU & allied accessories installed at ICCU deptt. In Civil Hospital Alibaug. Tal-Alibaug. Dist. Raigad. (For 36 Months) | रु. २३,६१,०६०/- | दिनांक २८.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक ०८.०३.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रु. २३७००/- ४) निविदा शुल्क रु. ५००/- अधीक GST | दिनांक १०.०३.२०२५ सकाळी ११:०० |

**खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.**
१. https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
२. कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन कोड-४०२१०७ दुरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८ या कार्यालयातील सुचना फलक
३. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पूर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र.। मध्ये जोडण्यात यावे.
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.

**सही/**
**(सं.ध. कट्टी)**
**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. पेण-रायगड**

**आरओसी -२०२४-२५/क्र-५/c ६७२७**

# पनवेल मनपातर्फे रेबीज निर्मूलन

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रेबीजचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पनवेल महानगरपालिका हद्दीत झिरो रेबीज निर्मूलन उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचे उद्घाटन गुरुवारी (दि.२७) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले.



या वेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, पशुवैद्यकीय अधिकारी सर्वश्री डॉ. भगवान गीते, डॉ. मधुलिका लाड उपस्थित होते.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या कार्यक्रमांतर्गत नॅशनल अ‍ॅक्शन प्लान फॉर डॉग मेडिएटेड रेबिज एलिमिनेशन फ्रॉम इंडिया बाय २०३०या शासनाच्या कार्यक्रमाच्या धरतीवर रेबीजचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये झिरो रेबीज निर्मूलन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी पालिका क्षेत्रातील भटक्या श्वानांची अँटीरेबीज लसीकरण व लोकांमध्ये जनजागृती करण्यावर भर देण्यात येणार आहे.

श्वान चावल्यानंतरच्या वैद्यकीय उपचारांबाबत सामान्यांमध्ये खूप कमी प्रमाणात जनजागृती आहे. यामुळेच, जगभरात दरवर्षी ५९ हजारपेक्षा जास्त लोकांना रेबीजमुळे आपले प्राण गमवावे लागतात. रेबीजमुळे जगभरात होणाऱ्या मृत्यूपैकी ३६ टक्के मृत्यू एकट्या भारतात नोंदवण्यात येतात. रेबीज अतिघातक व्हायरल रोग आहे. एकदा रेबीज श्वान चावल्यावर त्यावर कुठलाही उपाय नाही. रेबीज झाल्यावर त्याचा मृत्यू होतो. त्यामुळे त्यासाठी मनुष्याप्रमाणे श्वानांना अँटीरेबीज लसीकरण करणे हा एकमेव उपाय आहे.

श्वानांच्या लसीकरण करण्याकरिता ईनिविदेद्वारे युनिवर्सल निमल वेलफेअर संस्थेस परवानगी देण्यात आली आहे. या संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे १७ हजार ५०० भटक्या श्वानांना अँटी रेबीज लसीकरण वॉर्डनिहाय करण्यात येणार आहे.

महापालिकेच्या वतीने रेबीज निर्मूलनकरिता लवकरच इंटिग्रेटेड डॉग बाईट मॅनेजमेंट प्रोटोकॉल, मॉडेल अ‍ॅन्टी रेबीज क्लिनिक स्थापित करण्यात येणार आहेत.

# अतिक्रमण विभागातर्फे ऐरोलीत तोडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई केली.



नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली येथील सर्वे २२४, २२५, ३९५ सेक्टर – ९, दिवा गाव ऐरोली, येथील बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. या अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविले नसल्याने सदरचे अनधिकृत बांधकाम २५ फेब्रुवारी २०२५ रोजी अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले आहे.

या धडक मोहिमेसाठी एक गॅस कटर, दोन ब्रेकर, जेसीबी एक व १० मजूर यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमेकरीता जी विभाग ऐरोलीचे सहाय्यक आयुक्त अंकुश जाधव व कनिष्ठ अभियंता संदीप म्हात्रे तसेच इतर अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित होते.

ही कारवाई अंतर्गत दंडात्मक शुल्क रूपये २५ हजार वसूल करण्यात आले आहे. तसेच यापुढेदेखील अशाप्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

# महाशिवरात्रीनिमित्त फराळ वाटप



**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते शंकर माटे, भाऊ भापकर, पांडुरंग आमले व बाबाजी इंदोरे यांनी शिव मंदिर व गणेश मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांना प्रसाद व फळांचे वाटप केले.

या वेळी माजी नगरसेवक बाळाराम पाटील, सोमनाथ वासकर, शिरीष पाटील, सुरेश दिवे, उबाठाचे विभाग प्रमुख अजय पवार, सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष विठ्ठल गव्हाणे, डॉ. विजया गोसावी, खजिनदार विष्णुदास मुखेकर, सहखजिनदार सुभाष बारवाल, बळवंतराव पाटील, भानूमती शहा, मारुती विश्वासराव, ज्ञानेश्वर जाधव, बल्लाळेश्वर सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष आनंद गावडे, संचालक वसंत गावडे, मिलेनियम टॉवर बी टाईप सहकारी हाउसिंग सोसायटीचे मॅनेजिंग कमिटी मेंबर आणि चित्रपट व दूरदर्शन मालिकेतील मराठी अभिनेते शिवाजी पाटणे, सिताराम मास्तर उद्यानातील ७.५० गार्डन ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी (दि.२७) ‘मराठी भाषा गौरव दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यालयात ‘कविता वाचन’ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.





कार्यक्रमाची सुरुवात मराठी भाषेच्या महान साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला अभिवादन करून झाली. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणेपदी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत हे होते. स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्या निशा नायर आदी मान्यवर उपस्थित होते. संजय भगत यांनी भाषणातून मराठी भाषेचे जतन आणि संवर्धनाच्या गरजेवर भाष्य केले. प्राचार्यांनी मराठी भाषेच्या महत्त्वावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना अधिकाधिक मराठीत लेखन व वाचन करण्यासाठी प्रेरित केले.

कविता वाचन स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी मराठी साहित्यातील श्रेष्ठ कविंचे काव्य वाचन केले आणि वातावरणात रंगत आणली. मराठीच्या या सणामुळे विद्यालयात उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमास प्राचार्या निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकवृंदाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी.देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे आदींनी शुभेच्छा देऊन कौतुक केले.

# डॉ. प्रभाकर पटवर्धन यांच्या स्मृतिदिनानिमित्त व्याख्यान



**पनवेल : वार्ताहर**

रा.स्व.संघ जनकल्याण समिती व पटवर्धन रुग्णालय पनवेल यांचा वर्धापन दिन तसेच डॉ.प्रभाकर पटवर्धन यांच्या स्मृतिदिनानिमित्त सुनील देवधर यांचे विकसित भारत व पूर्वोत्तर भारत या विषयावर आगरी समाज हॉल पनवेल येथे व्याख्यान झाले.

सुरुवात सुनील देवधर व प्रकल्प समिती पदाधिकारी यांच्या हस्ते डॉ.प्रभाकर पटवर्धन यांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर धन्वंतरी स्तवन झाले. रुग्णालय व जनकल्याण समितीचा माहितीपट दाखविण्यात आला. पाहुण्यांचे स्वागत प्रकल्प पालक व जनकल्याण समिती प्रांत कोषाध्यक्ष प्रदिप पराडकर यांनी केले. प्रास्ताविक संस्था अध्यक्षा डॉ.किर्ती समुद्र यांनी केले.

महाराष्ट्रात चालणाऱ्या जनकल्याण समितीच्या प्रकल्पांची माहिती प्रदिप पराडकर यांनी करुन दिली. रुग्णालयातील राकेश पाटील (भांडार विभाग) दिलिप पाटील (शस्त्रक्रिया विभाग) वैभव जाधव (क्ष किरण विभाग) साक्षी साळुंखे (सोनोग्राफी विभाग) यांना उदयराव टिळक कुटुंबियांतर्फे श्रीमती नीलाताई पटवर्धन स्मृती पुरस्कार त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल देण्यात आला.

रुग्णालय जनसंपर्क अधिकरी प्रसन्न खेडकर यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. पंकज पात्रीकर यांनी आभार मानले.

सूत्रसंचलन संस्थेच्या सहकार्यवाहिका अनुराधा ओगले यांनी केले. संस्थेच्या अध्यक्षा डॉ.किर्ती समुद्र, उपाध्यक्ष डॉ.ययाती गांधी, कार्यवाह राजीव समेळ,जनकल्याण समिती कोषाध्यक्ष प्रदिप पराडकर, संस्था पदाधिकारी तसेच पनवेलकर नागरिक उपस्थित होते. सांगता राकेश पाठक यांनी म्हटलेल्या संपूर्ण वंदे मातरम्ने झाली.

# ‘सीकेटी’च्या साक्षी धनावडेचा राष्ट्रीय एकात्मता शिबिरात उत्स्फूर्त सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय, नवी दिल्ली तथाशिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने १६ ते २२ फेब्रुवारी २०२५दरम्यान शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे दिमाखात आयोजन करण्यात आले. याच धर्तीवर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेविका साक्षी संतोष धनावडे (द्वितीय वर्ष विज्ञानशाखा) हीने मुंबई विद्यापीठ तथा महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रीय पातळीवर यशस्वीरीत्या प्रतिनिधित्व केले.



या शिबिरात देशभरातली २००पेक्षा अधिक रा.से.यो. स्वयंसेवक आणिस्वयंसेविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सदर शिबिराच्या उद्घाटन समारंभास महाराष्ट्र आणि गोवा राज्याच्या रा.से.यो. प्रादेशिक संचालनालयाचे युवा अधिकारी सुमंतकुमार यादव तथा शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर च्या रा.से.यो. चे संचालक डॉ. टी. एम. चौगुले यांची प्रमुख उपस्थिती राहिली.

स्वयंसेवकांच्या चमूने शिवाजी विद्यापीठाच्या जलसंधारण प्रकल्पांना भेट देवून स्वयंसेवकांना जलसंधारणाचे महत्व उद्धृत करत, सिद्धगिरी मठ तथा न्यु पॅलेस, कोल्हापूर याठिकाणी भेट दिली. तद्नंतर तरुणाई आणि सोशल मीडिया या विषयावर पाच गटांमध्ये वादविवाद स्पर्धा घेण्यात आली, ज्यामध्ये साक्षी धनावडे हिने शिवनेरी गटाच्या वतीने सहभाग घेत स्पर्धेत दुसरेस्थान पटकावले.

साक्षी संतोष धनावडेच्या अतुलनीय कामगिरीबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस.के. पाटील यांच्या हस्ते तिचा यथोचित गौरव करण्यात आला. या वेळी सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. निलेश वडनेरे, रा.से.यो. चे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. एस.एन. परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मुनिव यांची उपस्थिती होती. साक्षी धनावडे हिने मनोगतामध्ये प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील यांचे मार्गदर्शन आणि रा.से.यो. चे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. एन. परकाळे, कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मूनिव, प्रा. आकाश पाटील, प्रा. आलोक भानुशाली, प्रा. रुपाली पाटील, प्रा. पुजा दांदळे आणि प्रा. रुपेश माने यांच्या सदैव प्रोत्साहनपर दिशानिर्देशनाबाबत कृतज्ञता व्यक्त केली.

# ४ मार्चपासून ‘प्रेरणा जल्लोष’

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

पाताळगंगा रसायनी परिसरातील सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल ’प्रेरणा जल्लोष २०२५’ ४ मार्चपासून १२ मार्च पर्यंत आयोजित केला आहे. परिसरातील शाळा, सांस्कृतिक मंडळ, क्लब, सोसायटी, औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांच्या साठी हा कार्यक्रम खुला असणार आहे.

कराओके गायन (शालेय आणि खुला गट), सुदृढ बालक (२ वर्षांपर्यंत), भजन स्पर्धा, हॅपी कपल, पाक कला, रांगोळी (शालेय आणि खुला गट), फॅन्सी ड्रेस (छोट्यांसाठी), समूह गायन, समूह नृत्य अशा भरपूर स्पर्धांचे आयोजन यंदाही करण्यात आले आहे.

स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी अनिश इलेक्ट्रिकल, मोहोपाडा (९२७२५२१११२) दत्त प्रसाद स्टुडिओ, या ठिकाणी प्रवेशिका उपलब्ध आहेत. २ मार्चपर्यंत प्रवेशिका स्वीकारल्या जातील. प्रत्येक स्पर्धेसाठी मर्यादित प्रवेश घेण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले आहे.

# ११ मार्च रोजी पेन्शन अदालत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार ११ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे.

कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे, असे कोकण विभाग तहसिलदार, (सामान्य प्रशासन) महेंद्र बेलदार यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

## क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : महाशिवरात्रीनिमित्त नवेदर नवगाव येथे श्री बोरेश्वर महाराज यांची पालखी काढण्यात आली होती. या वेळी गावकरी एकत्र आले होते. त्यांनी अत्यंत श्रद्धेने व भक्तिभावाने पालखी सोहळ्यात सहभाग घेतला.** (छाया : जितू शिगवण)

# मोहोपाडा शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये १९९८–९९ मध्ये दहावीत शिक्षण घेतलेल्या ९४ विद्यार्थ्यांनी रविवारी (दि.२३) विद्यालयात एकत्र येत आठवणींना उजाळा दिला. सोशल मीडियाच्या माध्यमातून हे वर्गमित्र पुन्हा २५ वर्षांनंतर एकत्र जोडले गेले.



आई–वडिलांच्या इतकेच गुरुजनांनी संस्कारांचे पैलू पाडल्याने जीवनात स्थैर्य आहे, अशी कृतज्ञतेची भावना विनायक कानडे, डॉ. अशोक गीते, दुर्ग सेवक मनोज गायकर, हरिश्चंद्र गायकवाड, किरण जुनघरे, अमोल काणे, दीपाली पाटील, कांचन कांबळे, जगदीश केंडे यांनी व्यक्त केली. ग्राम सुधार मंडळाचे अध्यक्ष डॉ. पद्मनाभ पळणीटकर, माजी शिक्षक बाळासाहेब सावर्डे, पंडित बाविस्कर, शशिकांत जाधव यांनी आठवणींना उजाळा देत मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले. प्राचार्य सुधाकर चव्हाण यांनीही विचार मांडले.

या वेळी माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेला तब्बल दहा ग्रीन व्हाईट बोर्ड भेट देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विनायक पाटील, विकास बडे, योगीराज पाटील, श्रीराम गायकवाड, ललिता गुडसे, पुनम महाडिक, वैशाली गडगे, अमोल काणे, आनंद जोशी आदींनी विशेष मेहनत घेतली.

# रायगडातील महादेव मंदिरांमध्ये विविध कार्यक्रम

## स्वयंभू तीर्थक्षेत्र, तळाघर



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील तळाघर येथील स्वयंभू तीर्थक्षेत्र श्री महादेव मंदिरामध्ये महाशिवरात्री निमित्ताने हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. धाटाव विभागासह रोहा तालुक्यामध्ये जागृत देवस्थान म्हणून तळाघर महादेव मंदिराची सर्वत्र ख्याती आहे .

महाशिवरात्र हा वर्षातील सर्वात महत्वाचा दिवस समजला जातो, त्यामुळे श्री तीर्थक्षेत्र महादेव मंदिरामध्ये दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी उसळली होती. सकाळपासूनच भाविकांच्या रांगा पाहायला मिळाल्या.

## जीवनेश्वर मंदिर, श्रीवर्धन

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील प्रसिद्ध जीवनेश्वर देवस्थान, ज्याला 'श्री जीवनेश्वर मंदिर' म्हणून ओळखले जाते, हे स्थान एक अद्वितीय धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व असलेले आहे. या ठिकाणी दरवर्षी महाशिवरात्री महोत्सवाच्या वेळी मोठ्या प्रमाणावर भक्तांची हजेरी लागते. यंदाचा महाशिवरात्री महोत्सव ४ ते २७ फेब्रुवारीदरम्यान भव्यपणे साजरा करण्यात आला, ज्यामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वावर रथसप्तमीचे विशेष उत्सव आयोजित करण्यात आले, ज्याने भक्तांमध्ये एक वेगळ्या प्रकारचा भक्तिमय अनुभव निर्माण केला. यासोबतच श्री ज्ञानेश्वरी व शिवलीलामृत पारायण, कीर्तन



आणि महाप्रसाद असे विविध धार्मिक व भक्तिमय कार्यक्रम झाले. २५ फेब्रुवारीपासून २७ फेब्रुवारीपर्यंत नारदीय कीर्तनकार ह. भ. प. भाग्यश्री बिवलकर यांच्या नाम संकीर्तनाचे आयोजन करण्यात आले, ज्यामुळे भक्तांना एक अत्यंत अध्यात्मिक शांती मिळाली. २७ फेब्रुवारी रोजी काल्याचे कीर्तनही अत्यंत आकर्षक ठरले.

## धानेश्वर मंदिर, तुपगाव-चौक

**चौक : प्रतिनिधी**

सन १६६४ साली बांधण्यात आलेल्या धानेश्वर मंदिरात महाशिवरात्री साजरी करण्यात आली, येथे एक दिवसाची मोठी जत्रा भरली होती. या यात्रेत रायगड जिल्ह्यातील भाविक यांच्या बरोबर नवी मुंबई, मुंबई येथील भाविकांनी दर्शन घेतले.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात तुपगाव येथे धान्नेश्वर मंदिर आहे, हे मंदिर सन १६६४ साली बांधण्यात आलेले आहे. तुपगाव येथील एक शेतकरी आपल्या धान्याची मळणी करीत असताना त्याला शिवपिंड धान्यात सापडली, म्हणून त्याला धानेश्वर म्हटले जाते, अशी आख्यायिका आहे. या एक दिवसीय यात्रेचे नियोजन चांगल्या पद्धतीने केले होते, पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती.



## कर्जतमध्ये महाशिवरात्री उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

महाशिवरात्री असल्याने कर्जत तालुक्यातील महादेवाच्या प्रत्येक मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

कर्जत शहरातील श्री कपालेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. मुद्रेश्वर मंदिरातही दर्शनासाठी भक्तांनी गर्दी केली होती. पांडवकालीन वैजनाथ येथील मंदिरात शिवभक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. कोल्हारे येथे त्रिवेणी संगमावर असलेल्या पांडवकालीन शिवमंदिरामध्ये शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी सकाळी प्रचंड गर्दी झाली होती.

याशिवाय कर्जत तालुक्यातील सर्वच शिवमंदिरात मोठ्या उत्साहात महाशिवरात्री उत्साहात साजरी करण्यात आली. लाखरन, कोषाणे, साळोख, तमनाथ, माथेरान, मानिवली, बिरदोले, शेलू, धामोते येथील धनेश्वरी, नेरळमधील कुसुमेश्वर मंदिर, निर्माण नगरी येथील शिवमंदिर, मोहाचीवाड़ी, भड़वळ, कळंब, पोही, खांडस, देवपाड़ा, वंजारपाडा, गुढवण, कशेळे, वारे, कोठींबे, आंबिवली, मांडवणे, लाखरन, चांदई, कडाव, बीड, देऊळवाड़ी आदी ठिकाणी असलेल्या शिव मंदिरात सर्वत्र भक्तांची गर्दी होती. माथेरान येथील पिसरनाथ महाराज तसेच कर्जत शहरातील धापया आणि कपालेश्वर येथील मंदिरात शिवरात्री निमित्य असंख्य धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू होती.



## पाटणेश्वर मंदिर, पेण

**पेण : प्रतिनिधी**

दरवर्षी महाशिवरात्रीला शिवमंदिरांमध्ये दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी असते. पेण पाटणेश्वर येथील श्री क्षेत्र पाटणेश्वर मंदिरातही आज महाशिवरात्री साजरा करण्यासाठी भाविकांनी गर्दी केल्याचे पाहायला मिळाले.

दर्शनासाठी रायगडच्या वेगवेगळ्या भागांमधून भाविकांनी श्री क्षेत्र पाटणेश्वर मंदिरात दर्शन करण्यासाठी मध्यरात्रीपासूनच मोठी गर्दी केली होती. सालाबादप्रमाणे दुपारी १२ च्या सुमारास पाटणोली गावातून भोले बाबाची पालखी काढण्यात आली. ताल मृदुंगाच्या गजरात २ च्या सुमारास पालखी मंदिरात आणण्यात आली.

या पालखी सोहळ्यासाठी पाटणोली गावातील तरूण वर्ग जरी कामानिमित्त बाहेर असले तरी ते पालखीसाठी आवर्जून हजर राहतात. आणि पालखीचा आनंद द्विगुणी करतात. यावर्षी मोठ्या उत्साहात तरूण वर्गांनी हरिपाठाच्या तालावर ताल धरत, नाचत फुगड्या खेळत पालखी सोहळ्यात रंग भरला.

गर्दीची गैरसोय होऊ नये म्हणून पुजारी, पाटील पाटील कुटुंबास पाटणेबर ग्रामस्थांनी अपार मेहनत घेतली. या वेळी पेणमधील गोटेश्वर मंदिर, विश्वेश्वर मंदिर तसेच तालुयातील मंदिरात भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

## भोगेश्वर मंदिर, मुरूड

**मुरूड : प्रतिनिधी**

महाशिवरात्र हा वर्षातील सर्वात महत्वाचा दिवस समजला जातो आणि त्याचनिमित्ताने मुरूड शहरातील प्राचीन काळातील भोगेश्वर पाखाडी चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समाज व देवस्थान ट्रस्टमधील शिव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भाविकांच्या उत्साहाला उधाण आले.

बम बम भोलेचा जयघोष करत शेकडो भाविक हे मुरूड शहरांसह पंचक्रोशी भागातील मंदिरात दर्शनासाठी घेण्यासाठी भाविकांची गर्दी उसळली. संपूर्ण मंदिर सुंदर फुलांनी सजले असून आकर्षक विद्युत रोषणाईमुळे भक्तिमय वातावरण झाले.

या वेळी अध्यक्ष नैनिता कर्णिक, नयन कर्णिक, अशोक सबनीस, प्रसाद जाळगांवकर, संजय गुंजाळ व आदिंसह शिवभक्त उपस्थित होते. शिवभक्त-दिनेश मिणमिणे व त्यांच्या पत्नी जिविता मिणमिणे यांनी ही शिवलिंग वर दुधाचा अभिषेक करून मनोभावे पुजा करण्यात आली.



## वीरेश्वर मंदिर, खोपोली

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली सह खालापुरात महाशिवरात्री निमित्त मोठया प्रमाणात धार्मिक कार्यक्रम पार पडलीत. खोपोलीतील पेशवेकालीन भगवान वीरेश्वर मंदिरात महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला.

प्रती वर्षाप्रमाणे या ही वर्षी आकर्षक विद्दुत रोषणाईने सर्वच



शंकर मंदिर व परिसर सजला होता. खोपोलीचे ग्रामदैवत असलेले भगवान विरेश्वर मंदिरात भाविकांची सर्वाधिक गर्दी झाली होती. वरची खोपोली ग्रामस्थ मंडळ,वीरेश्वर मित्र मंडळ व विरेश्वर मंदिर व्यवस्थापन कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने येथे दिवसभर भजन, कीर्तन व महाप्रसादासह धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा लाभ भाविकांनी घेतला.

पालखी मिरवणूक विरेश्वर मंदिर पासून सुरू होऊन, वरची खोपोली, मुख्य बाजारपेठ मार्गे शहरातून पुन्हा मंदिर परिसरात येऊन या पालखी सोहळ्याची सांगता झाली .खालापूर तालुक्यातील सर्वच शंकर मंदिरातही महाशिवरात्री निमित्ताने भोले शंकराचा जयजयकार व भक्तीमय वातावरण होते.

## रामेश्वर मंदिर, चौल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

शिवरात्रीच्या निमित्ताने चौल श्री रामेश्वर मंदिरात भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी होती. या वेळी श्री रामेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी रांग लागली होती.

शिवरात्री उत्सव प्रसिध्द श्री चौल रामेश्वर मंदिरात मोठया उत्साहात साजरा केला जातो, त्यानिमित्त श्री रामेश्वर मंदिरात आकर्षक फुलाची सजावट करण्यात आली होती. या निमित्त श्री रामेश्वर मंदिर परिसरात पुजाअर्चासाठी फुले, हार यांची दुकाने, तसेच चणे-शेगदांणे-कुरमुरे, तसेच मिठाईची दुकाने थाटण्यात आली होती. साडेतिनशे वर्षाचा ऐतिहासिक वारसा लाभलेले व जागृत देवस्थान म्हणून श्री रामेश्वर मंदिर प्रसिध्द आहे.



## बोरेश्वर मंदिर, नवगाव

**अलिबाग : प्रतिनिधी**

नवगाव येथील बोरेश्वर महाराजांचा महाशिवरात्र उत्सव साजरा झाला. महाशिवरात्र निमित्त दर्शनासाठी भाविकांची गर्दी जमा झाली होती.

बोरेश्वरच्या मंदिरातून पालखी मिरवणूक निघाली. पालखीसोबत श्री रघुनाथ महाराज प्रसादिक भजन मंडळ सोबत होते. चित्ताकर्षक श्री बोरेश्वर बँड पथक, कर्ण मधुर श्री ज्योती बँड पथक, सूर सम्राट श्री दत्तगुरु ब्रास बँड पथक यांची जुगलबंदी पाहण्यासाठी लोकांनी गर्दी जमा केली होती.



## निवडक

### प्रदीप पाटील यांना पुरस्कार



**चौक :** विद्या दानाचे पवित्र कार्य करीत असताना सामाजिक क्षेत्राशी निगडीत कार्य करणारे शिक्षक प्रदीप पाटील यांना खान्देश भूषण पुरस्काराने सन्मानीत करण्यात आल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रदीप पाटील यांना श्री सप्तशृंगी चॅरिटेबल ट्रस्ट सीबीडी बेलापूर नवी मुंबई यांच्या वर्धापनदिनी जेष्ठ पत्रकार निलेश खरे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मान देण्यात आला आहे.

### महाशिवरात्रीनिमित्त शिव ध्वजारोहण

**नागोठणे :** प्रजापिता ब्रह्माकुमारिज ईश्वरीय विश्वविद्यालय नागोठणे येथे महाशिवरात्री निमित्ताने शिव ध्वजारोहण कार्यक्रमाचे मंगळवारी झाला. या कार्यक्रमाला नागोठणे सेंटर इंचार्ज राजयोगीनी मंदा दीदी व पुनम दीदी यांच्या प्रमुख उपस्थितीत नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया काकडे, एस.डी परमार स्कूल च्या मुख्याध्यापिका अमृता गायकवाड, प्रसिद्ध व्यापारी मिलिंद ताले, ज्येष्ठ नागरिक गोपाळ खंडागळे यांच्यासह नागोठणे ब्रह्माकुमारिज विद्यालयाचा सर्व बी. के. परिवार उपस्थित होते.



## कांढरोली तर्फे वनखळवाडीतील शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम



**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा कांढरोली तर्फे वनखळवाडी या शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम सोहळा मोठया उत्साहात पार पडला.

या शाळेत दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही शाळेचा सांस्कृतिक सोहळा पार पडला यावेळी मुलांनी विविधी गाण्यांवर नृत्य सादर करून आपली कला सादर केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हेमंत म्हात्रे यांची निवड करण्यात आली होती.

या वेळी सुनील गायकवाड, रवी पवार, जनाबाई पवार, तुकाराम वाघे, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष दिपक पालकर आदी उपस्थित होते, सांस्कृतिक कार्यक्रम पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक संजय चव्हाण, श्रीकांत पोकळे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर पवार, आणि ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली.

## पीएम-उषा अंतर्गत आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

द. ग. तटकरे महाविद्यालय माणगाव व अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड जंजिरा यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम-उषा अंतर्गत रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र आणि संगणकशास्त्रातील नवीन प्रवृत्ती या विषयांवर चर्चा करण्यासाठी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, अंजुमन अंजुमन महाविद्यालयाचे चेअरमन जैनुद्दीन कादिरी, प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर व प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली ही परिषद झाली. या परिषदेसाठी २८० हून अधिक संशोधकांनी सहभाग घेऊन २०० हून अधिक शोधनिबंध संकलित करून त्याची स्मरणिका आय.एस.बी. एन.प्रणालीने प्रकाशित करण्यात आली.

परिषदेचे मुख्य वक्ते डॉ. वसंत पंडित माळी यांनी विविध शास्त्रशाखांचे संयोग आणि शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले.

डॉ. अविनाश आडे यांनी प्लास्टिक कचऱ्याचे जैव-विघटन करण्याच्या प्रभावी उपायांवर मार्गदर्शन केले. डॉ. गौरव लोहार यांनी दिले. डॉ. सनोवर हुसेन यांनी बायोडिग्रेडेबल फूड पॅकेजिंग फिल्मसाठी झिंक ऑक्साईड नॅनोपार्टिकल्सच्या संश्लेषण प्रक्रियेवर चर्चा केली. निलेश शिंदे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने तंत्रज्ञानातील करिअरला दिशा कशी देता येईल? यावर मार्गदर्शन केले.




## माझी वसुंधरा अभियानांतर्गत लोधीवली ग्रामपंचायतीचे उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत लोधीवली यांनी माझी वसुंधरा अभियान ५.० यशस्वी करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत. ग्रुप ग्रामपंचायत लोधीवली यांनी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यास सुरुवात केली असून, त्यामुळे पर्यावरण संतुलन बरोबर सामाजिक कार्यसुद्धा दिसून येत आहे.

नवीन बांधकाम परवाना देताना पर्यावरण संतुलन तसेच गटार, पाणी याचे नियोजन, डासमुक्त परिसर, नवीन बांधकाम करताना ते पर्यावरण पुरक, झाडे लावणे व ती जोपासना करण्यासाठी आणि नियमांना बांधिल राहील याकडे ग्राम पंचायत यांनी लक्ष दिले आहे. आदिवासी भागात पर्यावरणाचे रक्षण व महत्त्व पटवून देण्यात येत असून त्यामुळे जंगलाचे रक्षण होत आहे.

माझी वसुंधरा अभियान कायमस्वरुपी ठेऊन पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी काम केले जात असल्याचे सरपंच पूजा तवले आणि ग्रामपंचायत अधिकारी भाऊसाहेब गोलार यांनी सांगितले.



# पाकिस्तानची पाटी कोरीच!

## चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये अखेरचा गट सामनाही पावसामुळे रद्द

**रावळपिंडी : वृत्तसंस्था**

पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील चॅम्पियन्स ट्रॉफीमधील सामना न खेळताच रद्द करण्यात आला आहे. रावळपिंडी क्रिकेट स्टेडियमवर होणारा हा सामना नाणेफेक न होताच पावसामुळे रद्द झाला. यासह यजमान पाकिस्तान संघाची मोहिम चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये विजयाशिवाय संपली आहे. पाकिस्तानला एकाही सामन्यात विजय मिळवता आलेला नाही.



अ गटातील पाकिस्तानच्या संघाने सुरुवातीचे दोन सामने गमावल्याने त्यांना उपांत्य फेरी गाठणे अवघड झाले. त्यामुळे पाकिस्तान या स्पर्धेतून बाहेर झाला आहे. या गटातून भारत आणि न्यूझीलंड हे दोन संघ उपांत्य फेरीत पोहचले आहेत. पाकिस्तानसोबतच बांगलादेशचा संघही स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

पावसामुळे पाकिस्तान-बांगलादेश सामन्याच्या नाणेफेकीला उशीर झाला. रावळपिंडीत ओल्या आऊटफिल्डमुळे सामना सुरू होऊ शकला नाही. सामन्यापूर्वी कोसळणारा पाऊस नुकताच थांबला होता, मात्र ओल्या मैदानामुळे सामना सुरू होऊ शकला नाही. पाकिस्तानी संघाला पहिल्या सामन्यात न्यूझीलंडकडून ६० धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. यानंतर भारतीय संघाने त्यांना सहा विकेट्सने पराभूत केले आणि आता त्यांचा बांगलादेशविरुद्धचा सामना रद्द करण्यात आला.

चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद भूषवणारा आणि स्पर्धेत एकही सामना जिंकू न शकलेला पाकिस्तानी संघ केनियानंतरचा दुसरा संघ ठरला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी २०००मध्ये जेव्हा केनिया हा यजमान संघ होता तेव्हा तो फक्त एकच सामना खेळला आणि पराभूत झाला होता. त्यानंतर पाकिस्तानवर ही नामुष्की ओढावली आहे.

### यजमान गुणतालिकेत तळाशी

बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात पाकिस्तानचा विजय अपेक्षित होता, पण इथे संघाला खेळण्याची संधीच मिळाली नाही. दोन्ही संघांनी टॉससाठी काही तास वाट पाहिली, मात्र पाऊस थांबला नाही. त्यानंतर अखेर सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे निरोप घेण्याचे पाकिस्तान स्वप्नही भंगले. यासह यजमान संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील अ गटात शेवटच्या स्थानी राहिला आहे. पाकिस्तानच्या खात्यात एक गुण असून संघाचा नेट रन रेट -१.०८७ आहे, तर बांगलादेशचा संघ तिसऱ्या स्थानी असून त्यांच्या खात्यातही एक गुण आहे, पण त्यांचा रन रेट -०.४४३ आहे. जो पाकिस्तानपेक्षा चांगला आहे. न्यूझीलंड आणि भारत अनुक्रमे चार गुणांसह पहिल्या-दुसऱ्या स्थानी आहेत. अ गटातील अखेरचा सामना भारत-न्यूझीलंड यांच्यात २ मार्चला होणार आहे.

# अफगाणिस्तानची आज ऑस्ट्रेलियाशी लढत

## इंग्लंडविरुद्धच्या विजयामुळे सेमी फायनलच्या आशा कायम



**लाहोर : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानने यंदाच्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत एका धक्कादायक विजयाची नोंद केली आहे. अफगाणिस्तानने इंग्लंडचा आठ विकेट्सने पराभव केल्यामुळे ब गटातील सेमी फायनलचे गणित क्लिष्ट झाले आहे, पण या पराभवामुळे इंग्लंडचे चॅम्पियन्स ट्रॉफीतील आव्हान मात्र संपुष्टात आले असून अफगाणिस्तानचा संघ अजूनही उपांत्य फेरी गाठण्याच्या शर्यतीत कायम आहे.

इब्राहिम झद्रानचे (१७७) शानदार शतक आणि अझमतुल्ला ओमरझाई (४१ धावा आणि ५ विकेट) याच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर अफगाणिस्तानने शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या या सामन्यात इंग्लिश संघाचा अवघ्या आठ धावांच्या फरकाने पराभव केला.

अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि पहिल्यांदाच एखाद्या आयसीसी स्पर्धेत ३०० धावांचा पल्ला गाठला. अफगाणिस्तानने इंग्लंडविरुद्ध तब्बल ३२५ धावांचा डोंगर रचला. इब्राहिम झादरानची १७७ धावांच्या वादळी खेळीने संघाच्या या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. अखेरच्या दोन षटकांमध्ये म्हणजेच १२ चेंडूंत इंग्लंडला १६ धावांची गरज होती. फजलहकने त्या षटकात आर्चरला बाद करत तीन धावा दिल्या, तर अखेरच्या षटकात उमरझाईने प्रत्येक चेंडूवर एकेक धाव देत पाचव्या चेंडूवर आदिल रशीदला बाद करत इंग्लिश संघाला सर्वबाद केले आणि आपल्या संघाला दणदणीत विजय मिळवून दिला.

या विजयासह अफगाणिस्तानचा सेमी फायनलच्या आशा कायम राहिल्या आहेत. यासाठी आता त्यांच्यासमोर शुक्रवारी (दि.२८) ऑस्ट्रेलियन संघाचे आव्हान असेल. जर अफगाणिस्तानच्या संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धदेखील हीच धमक दाखवली तर हा संघ सेमीत धडक मारू शकतो. दुसरीकडे इंग्लंडचा संघ या पराभवासह स्पर्धेतून आउट झाला आहे. साखळी फेरीत ते दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अखेरचा सामना खेळतील.

## राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# पिंपरी चिंचवड, ठाणे ग्रामीण, जालना, कोल्हापूर किशोर संघ उपांत्यपूर्व फेरीत

**मनमाड : प्रतिनिधी**

ठाणे ग्रामीण, जालना, कोल्हापूर यांनी ३५व्या किशोर किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या किशोर गटात उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. नाशिक येथील स्व. माणकचंद ललवाणी इस्टेट (हेलिपॅड) मैदानातील मॅटवर ही स्पर्धा सुरू आहे.



उपउपांत्यपूर्व सामन्यात पिंपरी चिंचवडने पालघरचे आव्हान ४९-३४ असे संपुष्टात आणले. पहिल्या डावात अत्यंत चुरशीने खेळलेल्या या सामन्यात पिंपरी चिंचवडेने लोण देत २४-१५ अशी आघाडी घेतली होती. दुसऱ्या डावात आणखी दोन लोण देत सामना आरामात आपल्या नावे केला. पालघरने दुसऱ्या डावात लोण देत सामन्यात रंगत निर्माण केली, पण विजय त्यांच्यापासून दूरच राहिला.

ठाणे ग्रामीणने उस्मानाबादला ६०-४५ असे नमवित आगेकूच केली. मध्यांतराला ३३-२४ अशी आघाडी ठाण्याकडे होती. या सामन्यात बोनस गुणाची लयलूट झाली. ठाण्याने एकूण १७, तर उस्मानाबादने आठ बोनस गुणाची नोंद केली.

जालनाने जळगावला ५९-२० असे एकतफी नमवित उपांत्यपूर्व फेरी गाठली.

कोल्हापूरने औरंगाबादला ४१-२८ असे नमवित आपली विजयी घोडदौड सुरूच ठेवली. पूर्वार्धात २१-१३ अशी आघाडी घेणाऱ्या कोल्हापूरने उत्तरार्धात संयमाने खेळत सामना १३ गुणांच्या फरकाने जिंकला.

# डब्ल्यूपीएल : मुंबईचा युपीवर दणदणीत विजय

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

वूमन्स प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्सच्या संघाने उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर युपी वॉरियर्सचा एकतर्फी पराभव करत आठ विकेट्सने सामना जिंकला. नताली स्किव्हर ब्रंट आणि हिली मॅथ्यूज यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर मुंबईने १४३ धावांचे लक्ष्य सहज गाठले. या विजयासह मुंबईचा संघ आता लीगच्या गुणतालिकेत पहिल्या स्थानी पोहचला आहे.



मुंबईची कर्णधार हरमनप्रीत कौरने या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना यूपी संघाने २० षटकांत नऊ गडी गमावून १४२ धावा केल्या. मुंबईने १४३ धावांचे लक्ष्य आठ विकेट्स राखून पार करत गुणतालिकेचा संपूर्ण खेळच बदलून टाकला आहे.

युपीने दिलेल्या १४३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करतान मुंबईने सहा धावांवर यास्तिका भाटियाची पहिली विकेट गमावली. यानंतर जगातील पहिल्या क्रमांकाची व्हाईट बॉल अष्टपैलू खेळाडू हिली मॅथ्यूजने मोठे प्रयत्न करत आपला फॉर्म परत मिळवून ५० चेंडूत सात चौकार आणि दोन षटकारांसह ५९ धावांची उत्कृष्ट खेळी केली. शानदार फॉर्मात असलेल्या नॅट स्किव्हर ब्रंटने ४४ चेंडूत १३ चौकारांसह ७५ धावांची खेळी करत तिला चांगली साथ दिली, तर हिली बाद झाल्यानंतर हरमनप्रीत कौरने विजयी चौकार लगावत १७व्या षटकातच संघाला विजय मिळवून दिला.




## रोहितभोवती चाहत्यांचा गराडा



**दुबई : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफीमधील भारतीय संघाचे सर्व सामने दुबईमध्ये खेळवले जात आहेत. टीम इंडियाने स्पर्धेतील पहिले दोन्ही सामने जिंकत उपांत्य फेरीत धडक मारली आहे. दरम्यान, टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माचा दुबईतील एक व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.

सलग दोन सामने खेळल्यानंतर भारतीय संघ काही दिवसांच्या विश्रांतीवर आहे. भारताचा आता गट टप्प्यातील तिसरा सामना २ मार्चला न्यूझीलंडविरुद्ध होणार आहे. त्यामुळे खेळाडू विश्रांती घेत आहेत, तर काही खेळाडू दुबईत फिरण्याचा आनंद लुटक आहेत. दरम्यान, रोहित शर्माचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो दुबईच्या रस्त्यांवर फिरताना दिसत आहे.

कर्णधार रोहित शर्मा भारतीय संघाचे फिल्डिंग कोच टी दिलीप यांच्याबरोबर दुबईत रस्त्यावर फिरताना दिसत होता. रोहित सुरुवातीला साधारणपणे रस्त्यावरून चालत होता, पण काही वेळातच चाहत्यांनी रोहितला घेरले आणि सेल्फी काढण्याची स्पर्धा लागली. रोहितच्या आजूबाजूला चाहत्यांनी गर्दी केल्याचे दिसून आले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com